|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : ३५ सोमवार दि. १७ ऑगस्ट २०२० ते रविवार दि. २३ ऑगस्ट २०२० पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## सवर्णांच्या मुजोरीमुळे दलितांचे जीवनच धोक्यात आले
## शेळी शेतात गेली म्हणून एका गरीब मातंगाला ठार केले

देवणी/शकिल मणियार

शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात जातीयवादाला अजिबात थारा नाही. मात्र तरीही ग्रामीण भागात दलितांवर होणारे अत्याचार थांबलेले नाहीत आणि ॲट्रॉसिटी कायद्यामध्ये बदल करण्यात आल्याने आता या कायद्याचा जातीयवादी प्रवृत्तींना वचक राहिलेला नाही. त्यामुळे दलितांवरील अत्याचारांच्या घटना वाढत चाललेल्या आहेत आणि या घटना जर अशाच वाढत राहिल्या तर महाराष्ट्रातील गोरगरीब दलित आदिवासींचे जीवनच धोक्यात येईल. अगोदरच या देशात मॉबलिचिंगच्या घटना व वाढत असल्याने लोकांमध्ये भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण आहे. दलित अल्पसंख्यांक समाजाला टार्गेट केले जात आहे. मात्र सरकारकडून अशा घटनांची गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याची भावना दलित समाजात पसरत असल्याने हा संपूर्ण समाज चिंतातूर आहे. अशा घटनांमधून महाराष्ट्रात दलित विरुद्ध सवर्ण असा संघर्ष उफाळून येवू नये असेच सर्वांना वाटत आहे. पण त्यासाठी सरकारने जातीयवाद्यांवर कठोर ...पान ६ वर



### फिर्यादीवर प्रकरण मिटवण्यासाठी दबाव

बालाजी कांबळे यांची हत्या करणारे आरोपी हे पैसेवाले असल्याने त्यांना अजून अटक करण्यात आलेली नाही आणि आता तर त्यांच्याकडून प्रकरण मिटवण्यासाठी दबाव टाकला जात आहे. फिर्यादी सतीश कांबळे यांना दोन अनोळखी इसम भेटायला आले होते आणि त्यांनी सांगितले कि मेलेला माणूस काही पुन्हा येणार नाही, त्यामुळे जे काही असेल ते आता मिटवून टाका, तुम्हाला जे हवे असेल ते आम्ही द्यायला तयार आहोत पण हे प्रकरण मिटायला हवे असा धमकी वजा निरोप दिलाय. त्यामुळे कांबळे कुटुंब दहशतीत असून त्यांच्या जीवाला धोका आहे आणि अशा परिस्थितीत त्यांना संरक्षणाची गरज आहे.

## बारा वार झेलून तिने मृत्यूला चकवा दिला
## एकतर्फी प्रेम करणारा विष पिऊन मेला

दोडामार्ग/क्राईम रिपोर्टर

एकतर्फी प्रेम सहसा सफल होत नाही. मात्र अशा एकतर्फी प्रेमातून एखादा तरूण हताश झाला कि त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि मग तो जिच्यावर प्रेम करीत असतो. तिच्याशी सुखी संसाराची स्वप्न रंगवत असतो. अशा मुलीकडून जेंव्हा त्याला नकार मिळतो आणि तिचे दुसरीकडे लग्न ठरते, तेंव्हा मात्र तिच्यावर एकतर्फी प्रेम करणारा साक्षात सैतान बनतो आणि ती जर माझी होणार नसेल तर तिला दुसऱ्या कुणाचीही होऊ देणार नाही असा विचार करून तो तिच्या जीवावर उठतो. दोडामार्ग येथील वझरे कालकेरवाडी येथे अशाच एका घटनेत एकतर्फी प्रेमातून एका माथेफिरूने जिच्यावर त्याचे प्रेम होते तिच्यावर १२ वार करून तिला जखमी केले आणि त्यानंतर स्वतःही विष पिऊन आपले जीवन संपवले. सुदैवाने योग्यवेळी उपचार मिळाले म्हणून त्या मुलीचे प्राण वाचले. पण माथेफिरू प्रियकर मात्र मेला.

वझरे काळकेरवाडी येथील गोकुळदास काळकेकर या २६ वर्षीय तरूणाचे आपल्याच गावातील वासंती (काल्पनिक नांव) या १४ वर्षीय युवतीवर एकतर्फी प्रेम होते. वांसती ही दिसायला देखणी आणि सुंदर युवती होती. किशोरवयीन वांसती ही तारूण्यात पर्दापण करत असल्याने तारूणच्या छटा दिसुन येत होत्या.कुणी ही तिच्या प्रेमात पडाव असे तिचे सौंदर्य होते. तिला बघणारा कुणीही 'तुम कच्ची कली हो. कल फुल बन जावोगी. लाखो का दिल चुरावोगी, पर एक किसी की दुल्हन बन जावोगी' असेच त्याच्या मनात येत होते. अशा या वांसतीवर गोकुळदास हा मनातुन प्रेम करीत होता. तो सारखा तिच्या मागावर असायचा. ती भेटली की तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करायचा. तु माझी लैला आणि मी तुझा मजनु असे तिला म्हणायाचा. ती मात्र तो येताना दिसला की घाबरायची. ती त्याला टाळत होती. एकदा दोनदा त्याने तिला आडवुन माझे तुझ्यावर प्रेम आहे मला तु फार आवडतेस. तुझ्याशिवाय मी जगु शकत नाही, असे सांगुन तिचे मन वळविण्याचा ...पान २ वर

## बलात्काराचे व्हिडिओ शुटींग त्याच्या मित्रानेच केले
## अल्पवयीन मुलीला ब्लॅकमेल करणारे गजाआड झाले

जळगाव/क्राईम रिपोर्टर





आजकाल वयात आलेल्या मुलांमध्ये अकाली प्रौढत्व येते आणि त्यानंतर सिनेमातील प्रेम, इंटरनेटमधील अश्लील संकेत स्थळांवरचे सेक्स. यामुळे त्यांच्या लैंगिक भावना चालवतात आणि त्यातून त्यांच्या मनात श्रीदेहाचे आकर्षण निर्माण होते आणि मुले हळू हळू वाया जातात, त्यांच्या हातून बलात्कारा सारखे गुन्हे घडतात. जळगावमध्ये अशीच एक घटना घडली आहे. एका दहावीतील मुलीवर तिच्या प्रियकराने बलात्कार केला आणि त्याच्या मित्राने त्या बलात्काराचे व्हिडिओ शुटींग केले आणि त्यानंतर ती व्हिडिओ क्लिप व्हायरल करण्याची धमकी देवून तिच्यावर वारंवार बलात्कार करीत होते. अखेर या प्रकरणी तिने पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवतच दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली.

अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून एकाने लैंगिक संबंध प्रस्थापित केले. त्याचवेळी दुसऱ्याने धूर्तपणे दोघांचे मोबाईलमध्ये फोटो काढले व काही दिवसांनी हेच फोटो व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून याप्रकरणी तेजस दिलीप सोनवणे (२०) व चेतन पीतांबर सोनार (२०) या ...पान २ वर

## एकाही रुग्णालयाने त्यांना ॲडमिट नाही केले
## उपचाराअभावी दोन चिमुकल्यांचे प्राण गेले

भिवंडी/अभिजित हिरे





महाराष्ट्रातील खाजगी रुग्णालयांची मनमानी किती भयंकर आहे ते कोरोनाच्या संकटकाळात अनेक वेळा बघायला मिळाले होते. यात काही रुग्णांना आपला जीवही गमवावा लागला होता. त्यानंतर सरकारने काही रुग्णालयांवर कारवाई करून त्यांना सरकारी नियमांचे कठोरपणे पालन करण्याचे आदेश दिले होते, पण अजूनही खाजगी रुग्णालयांची मनमानी सुरूच आहे. याच मनमानीमुळे भिवंडीत दोन लहान मुलांना जीव गमवावा लागला. कारण या मुलांच्या पालकांनी तब्बल ८ रुग्णालयांचे उंबरठे झिजवून सुद्धा एकाही रुग्णालयाने या मुलांना दाखल करून न घेतल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर भिवंडीत संतापाची लाट उसळली आहे, तर संबंधित रुग्णालयांवर पालिकेने कारवाई न केल्यास आंदोलन करू असा इशारा कॉंग्रेसने दिला आहे.

कोरोना संकटात खासगी रुग्णालयांमध्ये वेळीच उपचार न मिळाल्याने अनेक नागरिकांना आला जीव गमवावा लागल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. त्याविरोधात नागरिकांमधून ओरड होताच राज्य शासनाने खासगी रुग्णालयांना विविध आजारांच्या रुग्णांवर उपचार करण्याचे सक्त निर्देश दिले आहेत. मात्र राज्य शासनाच्या या निर्देशांकडे खासगी रुग्णालये आजही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र भिवंडीत समोर आले आहे. खासगी रुग्णालयांच्या या मनमानी कारभारामुळे भिवंडीतील दोन बालकांना उपचाराअभावी तडफडून आपला जीव गमवावा लागला आहे.

शुक्रवारी (७ ऑगस्ट) रोजी शहरातील कल्याणरोड येथील अप्सरा टॉकीज परिसरातील फिजा बेकरी येथे राहणाऱ्या जमशेद अंसारी यांचा १४ महिन्यांचा मुलगा हाशिर हा पाण्याच्या टबमध्ये पडल्याने त्याला दुखापत झाली होती. तर याच दिवशी याच परिसरात राहणारे गौस शेख यांचा ३ महिन्यांचा मुलगा सैफ याची मालिश करतांना त्याने दुधाची उल्टी केली. त्यामुळे १४ महिन्यांच्या हाशिर व अवघ्या ३ महिन्यांचा सैफ या दोघांनाही त्यांच्या पालकांनी शहरातील ...पान २ वर

## मालकाच्या बायकोवर ठेवली वाईट नजर
## वासनांध सालगड्याची केली त्याने मर्डर



सोलापूर/क्राईम रिपोर्टर

नोकर माणसाने कामाच्या ठिकाणी प्रामाणिक राहून काम करायला हवे, तरच त्याची नोकरी टिकून राहते. पण काही नोकरांची नजर चांगली नसते. जिथे ते कामाला असतात तिथल्याच महिलांच्या बाबतीत त्यांच्या मनात घाणेरडे विचार येतात आणि मग कधी कधी त्यांचे धाडस इतके वाढते कि मालकाच्या कुटुंबातील महिलांची छेड काढायलाही ते मागे पुढे पाहत नाही. पांगरी मधील एका सालगडी इसमाने तसेच करताच मालकाच्या संतापलेल्या मुलाने आपल्या मित्राच्या मदतीने त्याला ठार मारून विहिरीत टाकले होते. मात्र हातातल्या राखीवरून मृतदेहाची ओळख पटली आणि पोलीस आरोपीपर्यंत पोहचले व त्यांना अटक केली.

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील पांगरी शिवारातील विहिरीत आढळलेल्या अनोळखी व्यक्तीच्या खुनाचा छडा त्याच्या हातात असलेल्या राखीवरून लागला असून सालगड्याचा तिघांनी गळा आवळून खून केल्याचे उघडकीस आली आहे. उत्तम नारायण कांबळे (वय ५५, रा. पिंपळगाव दे.) असे खून ...पान २ वर

## आंतरजातीय प्रेमविवाह करणारे गुन्हेगार ठरले
## मुलाच्या बापाला झाडाला बांधून बेदम मारले

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

महाराष्ट्रसारख्या पुरोगामी राज्यात आजही जातीयवाद कायम असून त्यातून काही ठिकाणी ओनर किलिंगच्या घटनाही घडलेल्या आहेत. त्यामुळे आजच्या तरूण पिढीवर जातीतल्याच मुला मुलींशी लग्न करण्याची कठोर बंधने आहेत. मात्र ज्याने हि बंधने तोडण्याचा प्रयत्न केला, त्याच्या प्राणाचे काही खरे नाही. आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना काय शिक्षा दिली जाते ते सैराटमध्ये लोकांनी पाहिलेय. मात्र तरीही प्रेम करणारे समाजाला न जुमानता प्रेम विवाह करतातच आणि त्याची त्यांना शिक्षा सुद्धा भोगावी लागते. भाळवणी गावात असेच घडले. दोन वेगवेगळ्या जातीतल्या प्रेमिकांनी आंतरजातीय प्रेमविवाह केला. त्यामुळे मुलीच्या नातेवाईकांनी मुलाच्या वडिलांना झाडाला बांधून बेदम मारहाण केली. तसेच त्यांचे घर जाळून टाकण्याची धमकी दिली. या प्रकरणी पोलिसांनी तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षासह १० जणांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.



मुलगी पळवून नेल्याच्या कारणावरून मुलाचे वडील दामाजी शेबा बरकडे (वय ५८) यांना भाळवणी गावातील दत्त मंदिराशेजारी भर चौकात असलेल्या लिंबाच्या झाडाला दोरखंडाने बांधून लिंबाच्या फोकाने बेदम मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी मुलीकडील रघुनाथ महादेव कांबळे, उत्तम महादेव कांबळे, महादेव निवृत्ती कांबळे, नामदेव निवृत्ती कांबळे, मलकिऱ्या जालिंदर कांबळे, हणमंत कांबळे, परमेश्वर गोरख कांबळे, धनाजी जालिंदर कांबळे, आबा नामदेव कांबळे या ...पान २ वर

## प्रेमासाठी त्याच्या हातून भलतेच घडून गेले
## प्रेयसीसाठी त्याने तिच्या शेजाऱ्याला ठार केले

मुंबई/एस.कुमार

प्रेयसीचा विश्वास जिंकण्यासाठी कोण काय करील याचा नेम नाही. कारण प्रियकर प्रेयसीसाठी जे काही करीत असतो त्यातून त्यांचे नाते अधिक घट्ट होत असते आणि प्रियसीही अगदी सहजपणे त्याच्याशी एकरूप होऊन त्याची हवी ती इच्छा पूर्ण करायला तयार होत असते. मुंबईच्या दिंडोशीत एका प्रियकराने प्रेयसीसाठी चक्क एकाचा खून केला. उसन्या पैशावरून झालेल्या भांडणात प्रेयसी व तिच्या आईला शेजाऱ्याने मारहाण केल्याचे समजताच चिडलेल्या प्रियकराने आपल्या एका मित्राच्या मदतीने प्रेयसीला मारहाण करणाऱ्या शेजाऱ्याची चाकूने भोसकून हत्या केली. मात्र दिंडोशी पोलिसांनी अवघ्या २४ तासात या हत्येतील आरोपींना गजाआड केले.

२६ मे रोजी ०१.०० वाजता दिंडोशी पोलीस ठाणे हद्दीत ओबेरॉय मॉलच्या समोरील दिंडोशी ब्रीजच्या खाली, गोरेगाव पूर्व, मुंबई या ठिकाणी एक इसम जखमी अवस्थेत बेशुद्ध पडला असल्याची माहिती दिंडोशी पोलीस ठाण्यात प्राप्त झाली होती. त्यानुसार दिंडोशी पोलीस ठाण्याचे व.पो.नि.धर्मेंद्र कांबळे याच्यासह पो.नि. मनोहर शिंदे, स.पो.नि. विजय जाधव, दिग्विजय पाटील, ...पान २ वर

## मेव्हण्याचे लक्षण काही ठीक नाही दिसले
## रक्षाबंधन पूर्वीच त्याने बहिणीचे कुंकू पुसले

जळगाव/क्राईम रिपोर्टर

पती पत्नी मध्ये सतत वाद होणे हे संसार विस्कटल्याचे लक्षण असते आणि अशा वादाला कंटाळून जेंव्हा एखादी विवाहिता सतत माहेरी येवू लागते, तेंव्हा माहेरच्या लोकांनाही तिच्या भवितव्याची चिंता वाटू लागते. याच चिंतेतून परमेश्वर पारधी याने त्याच्या बहिणीच्या नवऱ्याला अनेक वेळा समजावण्याचा प्रयत्न केला, पण तो ऐकत नव्हता. सतत पत्नीला त्रास देत होता आणि ती या त्रासाला कंटाळून सारखी माहेरी येत असे अखेर परमेश्वरने या प्रकरणाचा कायमचा निकाल लावण्यासाठी बहिणीच्या नवऱ्याचाच कायमचा काटा काढला आणि सरळ पोलीस ठाण्यात हजार झाला. या घटनेने जळगाव जिल्ह्यातील चिंचखेडा गाव हादरून गेले आहे.





आरोपी







भागवत पारधी याच्या लग्नाला तिन वर्ष झाले होते. या तिन वर्षाच्या वैवाहीक जिवनात त्याचे पत्नीसोबत फारसे जमले नाही. तो त्याच्या पत्नीसोबत सतत काहीना काही कारणावरुन वाद घालत असे. त्याच्या या नेहमीच्या त्रासाला वैतागून त्याची पत्नी माहेरी निघून जात असे. भागवतची पत्नी सासरी कमी व माहेरीच जास्त रहात होती. त्यामुळे भागवत देखील त्रासला होता. आपली बहिण सासरी न राहता माहेरीच जास्त रहात असल्यामुळे तिचा भाऊ परमेश्वर याला देखील ते योग्य वाटत नव्हते. विवाहीत महिलेने तिच्या सासरी राहिले पाहीजे असे त्याचे मत होते. परंतू आपल्या बहिणीला सासरी तिचा पती भागवत याचा जाच असल्याचे त्याला माहित होते. त्यामुळे तो त्याच्या ...पान २ वर

## आईच्या पाठिंब्यामुळे लेकीचा धीर वाढला
## प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढला

नवी मुंबई/राजेंद्र वेदांते

काही चंचल बायका स्वतःच्या हातूनच सुखी संसाराला चूड लावतात आणि आपल्या आयुष्याची राख रांगोळी करून घेतात. घरात जीवापाड प्रेम करणारा नवरा असतानाही जी बाई परपुरुषाच्या सहवासात अडकते आणि त्यातून जेंव्हा तिचे अनैतिक संबंध सुरु होतात तेंव्हा किमान तिच्या माहेरच्या लोकांनी तरी तिला सावरण्याचा आणि अनैतिक मार्गावरून परारुत्त करण्याचा प्रयत्न करायचा असतो. पण नेरूळमध्ये राहणाऱ्या संगीताच्या आईनेच आपल्या लेकीच्या अनैतिक संबंधाना पाठबळ दिले. इतकेच नव्हे तर लेकीच्या प्रियकराच्या मदतीने जावयाचा काटा काढला आणि त्याचा खून पचवण्याचा प्रयत्नही केला. पण एका मोबाईलनंबरमुळे पोलिसांनी मायलेकीचे कारस्थान उघडकीस आणले आणि त्या दोघींसह तिचा प्रियकर आणि त्याच्या साथीदारालाही अटक केली.



चौघे आरोपी



अनैतिक संबंध कधीही घातकच असतात. शरीराची क्षणीक सूखाची लैंगिक भूक भागवण्यासाठी पत्नी पतीचा मूडदा पाडायला मागेपूढे पाहत नाही. अशा असंख्य घटना रोजच घडत असल्यामुळे समाजमन सुन्न झाले आहे. पती-पत्नीच्या नात्याला काळीमा लागत आहे. अशा गुन्ह्यामुळे समाजात ...पान ६ वर

17 TO 23 AUGUST 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 15/08/2020 7:09 PM Page 1



## पान १ वरून....

### बारा वार झेलून तिने मृत्यूला चकवा...

प्रयत्न त्याने केला होता. तिचे मात्र त्याच्यावर प्रेम वैगरे काही नव्हते. तो गावातीलच असल्याने तिला त्याचा स्वभाव माहित होता. तो काही कामधंदा न करता उनाडक्या करत टपोऱ्या मित्रासोबत राहत होता. तसे वांसती ही चांगल्या आणि सुशिक्षीत घराण्यातील होती. तिच्यावर चांगलेच संस्कार झाले होते. नुकतेच तिने नववीची परिक्षा दिल्याने दहावीच्या वर्गाच्या आभ्यासाला ती जात होती. ती घराबाहेर पडली की गोकुळदास हा तिचा नेहमी पाठलाग करायचा. तिला सारखे बोलते करण्याचा प्रयत्न करीत होता. तो तिला म्हणायचा माझे तुझ्यावर प्रेम आहे. मला तु खुप आवडतेस. म्हणून तो तिला सारखा त्रास दयायचा. त्याच्या या त्रासाला ती कंटाळलेली होती. तो सारखा आपल्याला वाटेत अडवून त्रास देत असल्याचे तिने आपल्या घरच्या लोकांना ही सांगितले होते. तिच्या घरच्या लोकांनी ही याबाबत गोकुळदासला समज दिलेली होती. तो थोडासा टारगट आणि हेकेखोर असल्याने तिचे घरचे लोक ही त्याच्या नादाला फारसे लागलेले नव्हते. तो वाईट मित्रांच्या संगतीला लागुन दारू ही पित होता. कधी कधी तो दारुच्या नशेतच रस्तयात वांसतीला आडवून तिला त्रास देत होता. त्यामुळे आता तिच्या घरचे लोक ही तिच्याबाबत काळजी करत होते. जवळच्या पै- पाहुण्यात एकादे स्थळ बघुन तिचे लग्न लावून दयावे तर तिचे अजुन लग्नायोग्य वय ही झाले नव्हते त्यामुळे त्यांना काय करावे आणि काय नको असे झाले होते. तिच्याबाबत त्यांची काळजी वाढतच चालली होती. म्हणून त्यांनी तिचे शिक्षण दहावी नंतर बंद करण्याचा ही निर्णय घेतलेला होता.हल्ली उन्हाळयाची सुट्टी असल्याने ती बऱ्याचदा घरात असायची. घरातील कामाला मदत करत होती. त्यामुळे त्याला ती बाहेर कुठे ही दिसत नव्हती. तो आपल्या मित्रांच्याकडून ती कधी बाहेर येते. याची माहिती घेत होता. ती भेटत नसल्याने आणि ती आपल्या प्रेमाला प्रतिसाद देत नसल्याने तो तिच्यावर आधिकच चिडला होता. तो तिच्यासाठी कासावीस झाला होता. काहीही करुन तिने आपले प्रेम स्विकारावे असे त्याला वाटत होते. पण तिचे त्याच्यावर अजिबातच आणि मुळातच प्रेम नसल्याने तिने त्याच्या प्रेमाचा स्विकार केलेला नव्हता. कवीवर्य मंगेश पाडगावकरांच्या शब्दात 'प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमंच आमचं सेम असतं' एवढयावरूनच प्रेमाची खरी महती अधोरेखित होत असताना. खऱ्या प्रेमाला तिलाजंली देण्याचे काम एकतर्फी प्रेमात पडलेल्या युवकाकडून होत असते. आणि नेमके तसेच गोकुळदास याचे ही झाले होते. त्याचे तिच्यावर मनापासुन प्रेम होते. पण तिचे त्याच्यावर प्रेम नसल्याने त्याचा मार्ग हा वनवे होता. या वनवे मार्गावरून तो चालला होता. आणि त्यात त्याची फरफटत होत चालली होती. त्याला आता तिला कायम लक्षात राहिल असा धडा शिकवयाचा होता. त्याच्या डोक्यात फक्त एकच होते. की, वांसती जर आपली झाली नाही. तर तिला दुसऱ्या कोणाचीच होऊ दयायचे नाही. म्हणून तो तिच्याबाबत सैर भैर झाला होता.तिच्या प्रेमात तो इतका वेडा झाला होता की त्याला तिच्याशिवाय काहीच दिसत नव्हते,आणि सुचत ही नव्हते. एकदा दोनदा त्याने तिच्या घरी जाऊन ही तिच्या आई वडिलांना ही आपले तिच्यावर प्रेम आहे. मी तिच्याशी लग्न करणार आहे. तुम्ही तिचे लग्न दुसऱ्या कोणाशी ही लावून दयाला तर याद राखा अशी सरळ सरळ धमकीच दिली होती. त्यामुळे तिच्या घरचे लोक ही घाबरलेले होते. त्यांना ही यातुन काहीच मार्ग सापडत नव्हता. एक तर तो व्यसनाधीन आहे. आणि काहीही काम धंदा तो करत नसल्याचे त्यांना ही माहित होते. यातुन मार्ग कसा काढायचा याच विचारात ते होते. ते आता मुलगी वांसतीचे लग्न करण्याच्या विचारात होते.तिच्यासाठी स्थळे ही पाहयला सुरूवात केली होती. नेमकी ही गोष्ट गोकुळदासला समजली होती. तो तिच्या मागावर होता. रविवारी वांसती संध्याकाळी ४.३०च्या सुमारास गावातील विहिरीवर पाणी आणण्यासाठी आली होती. विहिरीवर तशी पाण्यासाठी गर्दी ही होतीच बायकांचा पाण्यासाठी गलका चाललेला होता. त्याचवेळी तेथे गोकुळदास हा दारूच्या नशेतच आला होता.तेथे येऊन तो वांसती बरोबर वाद घालीत तिला दमदाटी देत होता. तसा तो दारूच्या नशेत असल्याने ती त्याला काही बोलत नव्हती. तो तिला आपल्याबरोबर काही तरी बोल म्हणत होता. पण ती गप्पच उभी रहिली होती.तो तोंड सोडुन बोलत होता. तरीही ती ओळख नसल्यागत त्याला दाखवत असल्याने त्याला तिचा राग आलेला होता. त्यावेळी काही कळायच्या आतच त्याने आपल्या खिशातुन चाकु बाहेर काढून 'तु माझी झाली नाहीस तर मी तुला कुणाचीच होऊ देणार नाही.' असे म्हणत तिच्या अंगावर चाकुने बारा वार केले होते.तिच्या अंगावर ते वर्मी घाव बसल्याने ती रक्ताच्या थारोळ्यात तेथेच गंभीर जखमी होऊन पडली होती. विहिरीवर असणाऱ्या आया बायाच्या समोर ही घटना घडल्याने त्यांनी आरडा ओरडा कारायला सुरूवात केली होती. त्याचेवेळी गोकुलदास तेथुन पळून जाऊन पुढे काही अंतरावर थांबला होता. लोकाचा जमाव आपल्याकडे येत असल्याचे बघुन त्याने आपल्या खिशातील एक प्लॉस्टिक बाटली काढली होती.आणि त्यातील विष त्याने घडाघडा पिऊन टाकले होते.. त्याने ही विष पिल्याचे लक्षात येताच गावकऱ्यांनी त्याच्या भोवती गर्दी केली होती. त्याने जादा प्रमाणात विष प्राशन केल्याने त्याचा जागीच मृत्यु झाला होता. घटनास्थळी उपसभापती लक्ष्मण नाईक,वैभव इनामदार, संजय नाईक,दीपक गवस, राजु ठाकुर, आणि लक्ष्मण आयनाडकर याच्यासह मोठया प्रमाणात ग्रामस्थ जमले होते. या घटनेची माहिती दोघांच्या ही घरच्या लोकांना समजली होती. त्यांनी ही घटनास्थळी धाव घेऊन मोठयाने आक्रोश केला होता. कुणी तरी या घटनेची माहिती पोलीसांना दिली होती. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. पहिल्यादा पोलीसांनी घटनास्थळी गंभीर जखमी असलेल्या वांसतीला प्राथमिक उपचारासाठी दोडामार्ग येथील आरोग्य केंद्रात दाखल केले होते. तिची प्रकृती गंभीर आणि चिंताजनक असल्याने तेथील उपचारा नंतर तिला गोव्यातील बांबोळी येथील हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. तेथे तिच्यावर शस्त्रक्रिया केली गेली होती. तरी ही कथा शब्दबध्द होई पर्यत तिची प्रकृती चितांजनक अशीच होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन मयत गोकुळदास याचे प्रेत शवविच्छदेनासाठी सरकारी रुग्णायालयात पाठवले होते. घटनास्थळी पोलीसांना रक्ताने माखलेला चाकु तसेच घटनास्थळी जखमी वांसतीचे पडलेल्या चपला आणि गोगुळदासने विष प्राशन केलेली प्लॉस्टिकची बाटली आदि वस्तु आढळुन आल्या होत्या. त्या त्यांनी पंचनामा करून जप्त केल्या होत्या. पोलीसांनी या घटनेची माहिती मयत आणि वांसतीच्या नातेवाईकाकडून घेतली असता. त्याना ही घटना कोणत्या कारणातुन घडली होती. हे समजले होते. पोलीसांनी या घटनेसदंर्भात मयत गोकुळदास रावजी काळकेकर (वय २६) याच्या विरोधात गुन्हा नोंद करून या घटनेचा पुढील तपास चालु केला होता. गंभीर जखमी असलेल्या वांसतीने पोलीसांना सांगितले की, गोकुळदास हा तिच्या मागे कायम लागत होता.तो तिला माझ्यावर प्रेम कर. म्हणुन सांगत होता. घटनेच्या दिवशी ही त्याने याच विषयावरून माझ्याशी वाद घालत तु माझी झाली नाहीस तर.मी तुला कुणाचीच होऊ देणार नाही असे म्हणत माझ्या अंगावर चाकुने वार केले होते. एकतर्फी प्रेमातुन ही घटना घडली होती.त्यात गोकुळदास याने जागीच विष प्राशन करुन आत्महत्या केली होती. तर गंभीर जखमी वांसती मृत्युशी झुंज देत होती. एकतर्फी प्रेमातुन घडलेली ही घटना जेवढी संवेदनशील होती. तेवढीच ती गंभीर आणि विचार करायला लावणारी होती. खरे तर प्रेमाच्या बाबत प्रेमा तुझा रंग कसा असे म्हटले जाते. प्रेमात पडले की, जग हे सुंदर दिसत असते. तर एकतर्फी प्रेमात सैराट झालेल्या प्रियकराला कशाचेच भान राहत नसल्याने त्यातुन रक्तरंजित डाव खेळला जात असतो हेच या घटनेवरून दिसुन येते. सदर घटनेचा पुढील तपास दोडामार्ग पोलीस करत होते.

### बलात्काराचे व्हिडिओ शुटींग त्याच्या ...

दोघांविरुध्द बुधवारी रात्री शनी पेठ पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, यातील तेजस सोनवणे हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या महानगराध्य ममता सोनवणे यांचा मुलगा आहे, हा गुन्हा दाखल झाल्यानंतर पक्षाने तातडीने त्यांचा राजीनामा घेतला. जळगाव शहरातील १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे गल्लीतील राहणाऱ्या तेजस. दिलीप सोनवणे याच्यावर प्रेम होते. २८ फेब्रुवारी २०१९ रोजी मुलगी दहावीच्या परीक्षेचे रिसीट घेऊन घरी परत जात असतांना तेजस सोनवणे हा तिच्याजवळ आला. त्यावेळी तेजसचा मित्र चेतन पीतांबर सोनार हा देखील होता. तेजसने मुलीला दुचाकीवर बसवून कोल्हे हिल्स टेकडीवर नेले, तेथे गप्पा मारल्या. त्यांच्या पाठोपाठ चेतनही दुचाकीने कोल्हे हिल्सवर पोहचला. पीडिता आणि तेजसच्या गप्पानंतर एका इमारतीच्या आडोशाला तेजसने पिडीतेवर बळजबरी बलात्कार केला. याचवेळी चेतन याने मोबाईलमधे चोरुन फोटो काढले. या प्रकारामुळे पीडिताने तेजसशी बोलणे बंद केले होते. तसेच तेजस सोबतची मैत्री कुटुंबात समजल्याने मुलीला त्याच्यापासून लांब रहाण्याचे सांगण्यात आले होते. त्यामुळे तेजस व मुलगी या दोघांचे बोलणे बंद झाले होते. ही संधी साधून चेतन सोनार याने पीडितेशी मैत्री वाढविली. वर्षभर चाललेल्या मैत्रीनंतर चेतनने पीडितेला गोड बोलून फेब्रुवारी २०२० मध्ये पुन्हा कोल्हे हिल्स येथे नेले. कोल्हे हिल्स येथे पीडितेला नेल्यावर चेतन याने यापूर्वी तेजसने केलेल्या बलात्काराचे फोटो दाखविले. हे फोटो पाहून अल्पवयीन मुलीला धक्काच बसला. 'मलाही शरीर संबंध प्रस्थापित करू दे, नाही तर हे सर्व फोटो सोशल मीडियावर व्हायरल करेल, तुझ्या घरच्यांचे मोठे नुकसान करेल' तुझ्या वडिलांच्या वाहनाची तोडफोड करेल अशी धमकी दिली. यावेळी चेतननेही बलात्कार केला. तोपर्यत ही घटना मुलीने आई वडिलांना सांगितलेली नव्हती. गेल्या आठ दिवसांपासून संशयित आरोपी तेजस दिलीप सोनवणे आणि चेतन पीतांबर सोनार यांनी मुलीच्या नावाने शेरेबाजी करण्यास सुरुवात केली. फोटोची धमकी देऊन पुन्हा दोघांसोबत संबंध ठेवण्याबाबत दबाव टाकत होते. हे सर्व असह्य झाल्याने आपल्यासोबत घडलेला प्रकार पीडित मुलीने आई-वडिलांना सांगितला. बुधवारी रात्री मुलीच्या फिर्यादीवरून शनीपेठ पोलीस ठाण्यात संशयित आरोपी तेजस दिलीप सोनवणे आणि चेतन पीतांबर सोनार यांच्याविरुध्द बलात्कार व पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संशयित आरोपी तेजस सोनवणे तर राष्ट्रवादी महिला आघाडीच्या महानगराध्यक्ष ममता सोनवणे यांचा मुलगा आहे. मुलाचे नाव बलात्काराच्या गुन्ह्यात आल्यानंतर राजकीय दबाव किंवा पक्षाची प्रतिमा मलीन होऊ नये यासाठी राष्ट्रवादी महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी राष्ट्रवादी महानगरच्या महिला अध्यक्षा ममता सोनवणे यांच्याकडे पदाचा राजीनामा मागितला. पक्षाच्या आदेशानुसार, सोनवणे यांच्याकडे राजीनामा मागितला असून त्यांनी तो आपल्याकडे पाठविल्याची माहिती महानगराध्यक्ष अभिषेक पाटील यांनी दिली. गुन्हा दाखल होण्याची कुणकुण लागताच दोघे संशयीत फरार झाले. पोलिस निरिक्षक विठ्ठल ससे यांनी त्यांच्या शोधार्थ हवालदार दिनेशसिंग पाटील, हकीम शेख, रविंद्र पवार, महिला पोलिस नाईक अभिलाषा मनोरे, धनंजय येवले व राहुल पाटील यांचे पथक रवाना केले आहे.

### एकाही रुग्णालयाने त्यांना ॲडमिट नाही ...

विविध आठ खासगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी फिरवले मात्र एकाही खासगी रुग्णालयाने या मुलांना उपचारासाठी दाखल करून घेतले नाही. या दरम्यान काही खासगी रुग्णालयांनी ऑक्सिजन नसल्याचे कारण दिले तर काहींनी डॉक्टर व रुग्णालयांमध्ये आवश्यक सुविधा नसल्याचे कारण सांगितले. शेवटी खासगी रुग्णालयांचे उंबरठे झिजविण्यात या दोन्ही परिवारांचा वेळ गेला. त्यानंतर रात्री १२ वाजेच्या दरम्यान या दोन्ही बालकांना त्यांच्या नातेवाईकांनी धामणकर नाका येथे महापालिकेने ताब्यात घेतलेल्या ऑरेंज या खासगी रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी या दोन्ही बालकांना मृत घोषित केले. खासगी रूग्णालयांचे उंबरठे झिजविल्याने आपल्या मुलांचा जीव गेल्याची संतप्त भावना या दोन्ही मुलांच्या नातेवाईकांना झाल्याने मुलांच्या मृत्यूस उपचार न करणारे आठही खासगी रुग्णालये जाबादर असून या रुग्णालयांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी मृत बालकांच्या नातेवाईकांनी केली आहे. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान महामारीच्या संकटात रुग्णांवर उपचार करण्याचे निर्देश असूनही खासगी रुग्णालयांनी या बालकांवर उपचार केले नाही ही गंभीर बाब असून महापालिकेने या आठही रुग्णालयांवर त्वरित कारवाई करून पीडित कुटुंबियांना न्याय द्यावा अन्यथा महापालिके विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या भिवंडी शहर अध्यक्षा स्वाती कांबळे यांनी पालिका आयुक्त डॉ. पंकज आशिया यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

### मालकाच्या बायकोवर ठेवली वाईट...

झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर शिवाजी भीमराव बोकेफोडे व त्यांच्या मुलगा रवी शिवाजी बोकेफोडे व आबा उर्फ राहुल उध्दव माने यांच्यावर पांगरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. जैनुद्दीन गनी शेख (रा. पांगरी ता. बार्शी) यांनी त्यांच्या शेतातील विहिरीमध्ये अनोळखी व्यक्तीचे प्रेत पाहिल्यानंतर पांगरी पोलीस ठाण्यात खबर दिली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी विहिरीमध्ये पाण्यावर तरंगत असलेला कुजलेला मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला. त्यावेळी त्याचा केबल वायरने गळा आवळलेला दिसला. तसेच मृताचा शर्ट, बनियन व बूट विहिरीवर ठेवलेले दिसून आले. सदर व्यक्तीने विहिरीमध्ये उडी मारून आत्महत्या केल्याचा बनाव केला होता. परंतु पोलीसांना आत्महत्या केल्याबाबत संशयास्पद वाटले. मृताचे शवविच्छेदन पांगरी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.माळी व डॉ.तोरड यांनी जागेवरच केले. त्यावेळी त्याचा हातात एक पिवळ्या रंगाचे धाग्याची राखी बांधलेली होती. त्यामुळे गावामधून कोण रक्षाबंधन पासून बेपत्ता झाले आहेत काय? याबाबत चौकशी करण्यात सुरुवात केली. त्यावेळी पिंपळगाव दे गावचे पोलीस पाटील बाळासाहेब चांदने यांनी त्यांच्या गावातील उत्तम कांबळे हा रक्षाबंधनापासून बेपत्ता झाले असल्याचे सांगितले. पोलिसांनी बेपत्ता व्यक्तीचे घरी जाऊन राखी, शर्ट, बूट दाखविला असता नातेवाईकांनी या वस्तू मृत कांबळे यांच्याच असल्याचे सांगितले. पोलीस उपनिरीक्षक प्रविण सिरसाट यांनी अज्ञात आरोपी विरुद्ध सरकारतर्फे गुन्हा दाखल केला. प्रकरणांचा पोलिसांनी तपास केला असता कांबळे हा त्याच गावातील शिवाजी बोकेफोडे यांच्याकडे चार वर्षांपासून सालगडी म्हणून काम करीत होता.. कांबळे व बोकेफोडे यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला होता. तसेच घटनेदिवशी रात्री अकरा वाजता कांबळे हा घरी झोपला असताना शिवाजी बोकेफोडे यांनी त्यास मासे धरायचे आहेत असे सांगून नेले होते, अशी माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यास ताब्यात घेऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर तोरडमल यांनी चौकशी केली असता. कांबळे हा पत्नी व मुलीची वारंवार छेड काढत असल्यामुळे मुलगा रवी व राहुल माने यांनी कांबळे यास गोड बोलून मासे धरण्यास पांगरी शिवारातील शेख यांच्या शेतामधील विहिरीजवळ आणून केबलने कांबळे यांचा गळा आवळून खून करून मृतदेह विहिरीत टाकून दिल्याची कबुली दिली आहे.

### आंतरजातीय प्रेमविवाह करणारे गुन्हेगार...

९ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान अतिरिक्त पोलिस अधिक्षक अतुल झेंडे यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देवून व्हिडीओ शुटींगमधील घटनेत सामील सर्व लोकांना ताब्यात घेण्याच्या सूचना पोलिसांना करून ही अमानुष घटना असल्याचे प्रसारमाध्यमांना सांगितले. या घटनेची हकिकत अशी, यातील जखमी तथा फिर्यादी दामाजी बरकडे यांचा मुलगा आनंद हा दि. १ ऑगस्ट रोजी गावातील कांचन नामदेव कांबळे (वय १९) या मुलीला पळवून घेवून गेला होता. याबाबत पालकांनी बेपत्ता झाल्याची तक्रार पोलिसांत नोंदविली होती. दि. ४ ऑगस्ट रोजी बेपत्ता कांचन व आनंद हे दोघे पोलिस ठाण्यात समक्ष हजर झालेनंतर दोघांच्याही आई वडीलांना बोलावून घेतले होते. त्या बेपत्ता मुला मुलींनी लग्न केल्याने यावेळी दोघाही नातेवाईकांमध्ये समझोता होवून पुन्हा चार लोकात लग्न करण्याचे ठरले होते. तदनंतर मुलगी कांचन हिस तीच्या आई वडीलांच्या ताब्यात देण्यात आले.तसेच बेपत्ता खबरी जबाब घेवून तक्रार फाईल करण्यात आली होती. दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ७.०० वा. फिर्यादीचा मुलगा आनंद व मुलगी कांचन हे पुन्हा गावातून बेपत्ता झाले. दि. ११ रोजी सकाळी ९.०० वा. वरील ९ आरोपी अचानक फिर्यादीच्या घरी येवून पाहुण्यास फोन का केला असे म्हणून शिवीगाळ, दमदाटी करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तुइया मुलाने परत आमची मुलगी पळवून नेली आहे. असे म्हणून दोरखंडाने झाडाला बांधून लाकडी फोकाने पाठीवर मारहाण करून जखमी केले. यावेळी फिर्यादीची पत्नी, मुलगी, मुलगा यांनीही समजावण्याचा प्रयत्न केला. कोणाचेही या आरोपीने ऐकले नाही. शिवीगाळ करीत तुम्हाला बघून घेवू गावात एकच घर असून घर जाळून टाकू अशी धमकी दिली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.दरम्यान झाडाला दोरखंडाने बांधून मारहाण करीत असल्याचा व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल झाल्याने अतिरिक्त पोलिस अधिक्षक अतुल झेंडे यांनी सदर घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देवून घटनेमागची कारणमिमांसा जाणून घेतली. या घटनेतील सर्व आरोपींना अटक करण्याच्या पोलिस अधिकाऱ्यांना सक्त सूचना केल्या. आरोपीमध्ये एका महिलेचा समावेश असून रात्रीची वेळ असल्यामुळे तीला उदया बुधवारी ताब्यात घेण्यात येईल. तर अन्य एक फरार असून त्याचाही कसून शोध घेवून अटक केली जाईल असे ते म्हणाले. मुख्य आरोपीला अटक करण्यात आली आहे. घटनास्थळी पोलिस आल्यानंतर दोरखंडाने बांधलेल्या त्या फिर्यादीला मुक्त करण्यात आले. मुलीस पळवून नेवून आंतरजातीय प्रेमविवाह केल्याच्या कारणावरून मुलाच्या वडीलास गावातील भर चौकात झाडास दोरखंडाने बांधून अमानुष पध्दतीने मारहाण केल्याप्रकरणी तंटामुक्तीचे अध्यक्ष चंद्रकांत मोरे, मुलीचे वडील नामदेव कांबळे, रघुनाथ कांबळे, उत्तम कांबळे, महादेव कांबळे, मलकारी कांबळे, हणमंत कांबळे, परमेश्वर कांबळे, धनाजी कांबळे, आबा कांबळे या दहा जणांना पोलिसांनी अटक करून न्यायालयात उभे केले असता पाच दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. भाळवणी गावातील दत्त मंदिराशेजारी असलेल्या भर चौकातील लिंबाच्या झाडास मुलीचे वडील महादेव कांबळे व अन्य आरोपीने फिर्यादीस झाडास दोरखंडास बांधून लिंबाच्या ओल्या फोकाने मारून जखमी केले होते. या घटनेचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाल्यानंतर अतिरिक्त पोलिस अधिक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, डी.वाय.एस.पी. दत्तात्रय पाटील यांनी घटनास्थळी जावून सदर मुलाच्या वडीलाची दोरखंडाने बांधलेल्या स्थितीतून मुक्तता केली. तपासिक अंमलदार तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक भगवान बुरसे यांनी वरील सर्व आरोपींना अटक करून न्यायालयात उभे केले यावेळी अन्य फरार आरोपींचा शोध घेणे,मोटर सायकल व बांधलेला दोरखंड जप्त करणे घटनास्थळ निश्चीत करणे आदी मुद्दे न्यायालयासमोर मांडल्यानंतर न्यायालयाने दि. १६ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

### प्रेमासाठी त्याच्या हातून भलतेच घडून...

पो.उप.नि. गणेश फड आदी पोलीस पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून लगेच या घटनेची माहिती पोलीस उप आयुक्त डी. एस. स्वामी व स.पो.आ. सुभाष जाधव यांना दिली. ते तातडीने सदर ठिकाणी हजर झाले. घटनास्थळी एक ३० ते ३५ वर्ष वयाचा इसम रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. त्याच्या शरीरावर बऱ्याच ठिकाणी कुठल्या तरी धारदार हत्याराने भोसकून खून केल्याचे प्रथमदर्शनी दिसत होते. वरिष्ठच्या मार्गदर्शनखाली दिंडोशी पोलिसांनी दिसत्या परिस्थितीचा पंचनामा केला आणि तो अज्ञात इसमाचा मृतदेह पीएमसाठी भगवती रुग्णालयात पाठविला. त्यानंतर या गुन्ह्याचा तपास दिंडोशी पोलिसांनी सुरू केला . कोणीतरी या अज्ञात इसमाचा अज्ञात हत्याराने खुन केल्याचे स्पष्ट झाले असले तरी सदर मयत इसम कोण? त्याचा खून, कोणी, का आणि कशासाठी केला? या सर्व प्रश्नांची उत्तरे अनुउत्तरित असले तरी सुरुवातीला त्याची ओळख पटवणे अत्यंत आवश्यक होते. दरम्यान घटनास्थळावर मिळून आलेल्या मयताच्या मोबाईलमधील सीमवरून तांत्रीक तपासाला सुरूवात झाली. घटनास्थळी मिळून आलेला मोबाईल मधील सिमकार्ड हे अरुण शर्मा या इसमाच्या नावावर असल्याचे तपासात निसपन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी तो राहत असलेल्या घराचा पत्ता शोधून काढला. तेव्हा मयताचे नाव अरूण प्रभुनाथ शर्मा (वय ३१) रा. हनुमान सोसायटी, रिद्धी गार्डन समोर, बंजारीपाडा, फिल्मसिटी रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई असे असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी मयताचे वडील प्रभुनाथ शर्मा यांचा शोध घेवून त्यांना घडलेली सर्व हकीकत सांगितली. ते ऐकून त्यांना धक्का बसला. त्यानंतर त्यांना रुग्णालयात नेऊन तो बेवारस मृतदेह दाखविला असता, तो आपला मुलगा अरुण शर्मा याचा असल्याचे वडील प्रभुनाथ शर्मा यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिंडोशी पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाविरूध्द कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आली. आता मयताची ओळख पटली होती. मात्र आरोपीचा ठावठिकाणा शोधणे बाकी होते. मयताच्या कुटूंबाकडे या खुनाबाबत चौकशी करण्यात आली. परंतु शर्मा कुटुंबातील सदस्य त्यांनी कानावर हात ठेवले. मग पोलिसांनी आपल्या खास गुन्हयाच्या तपासामध्ये गुप्त माहितीदार , घटनास्थळ व आसपासचे सीसीटीव्ही फुटेजेस व तांत्रीक मदतीने कौशल्यपूर्ण तपास करून गुन्हयातील आरोपींची माहिती काढली. तेव्हा या गुन्ह्यातील संशयित आरोपी कल्पेश अशोक कळंबे (वय २४) व त्याचा मित्र शाहनवाज इंतजार खान ऊर्फ सानू (वय १८) हे असल्याचे समजले. दिंडोशी पोलिसांनी या दोघांचा ते राहत असलेल्या घरी व आसपासचे परिसरात शोध घेवून या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्यांची चौकशी केली असता या दोघांनी वेगळीच माहिती पोलिसांना दिली. ती पुढील प्रमाणे. मयत अरूण प्रभुनाथ शर्मा (वय ३१) हा हनुमान सोसायटी, रिद्धी गार्डन समोर, बंजारीपाडा, फिल्मसिटी रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई या ठिकाणी आपल्या कुटूंबासोबत राहत होता. त्याच्या शेजारी आरोपी कल्पेश कळंबे यांची प्रेयसी हर्षदा (नाव काल्पनिक) व तिची आई राहत होती. अरुणने कल्पेशची प्रेयसी हर्षदा हिला काही पैसे दिले होते. मात्र बरेच दिवस झाले तरी हर्षदा व तिच्या आईने ते परत केले नव्हते. ते पैसे परत करण्यासाठी अरुण सतत त्यांच्यापाठी तगादा लावत होता. मात्र हर्षदाच्या घरची परिस्थिती बेताची असल्याने वेळेवर पैसे परत करणे शक्य झाले नाही. याच कारणाहून अरुण याने कल्पेशची प्रेयसी हर्षदा व तिच्या आईशी वाद घालून घटनेच्या दिवशी या दोघी मयलेकिना मारहाण केली. ही गोष्ट हर्षदाने आपला प्रियकर कल्पेश याला सांगितली. आपल्या प्रेयसीला व तिच्या आईला अरुण शर्मा याने मारहाण केल्याचे कळाल्यावर कल्पेशला त्याचा राग आला. त्याने आपला मित्र शाहनवाज इंतजार खान ऊर्फ सानू याला ही गोष्ट सांगितली. मित्र शाहनवाज इंतजार खान ऊर्फ सानू याच्या मदतीने अरुण शर्मा याचा खून करण्याचा बेत आखला. त्यानुसार २५ मे रोजी कल्पेश व शाहनवाज इंतजार खान हे फिरण्याच्या निमित्ताने अरुण शर्मा याला दिंडोशी पोलीस ठाणे हद्दीत ओबेरॉय मॉलच्या समोरील दिंडोशी ब्रीजच्या खाली, गोरेगाव पूर्व, मुंबई या ठिकाणी घेऊन गेले. तिथे या दोघांनी अरुणवर धारधार चाकूने वार करून त्याचा खून केला आणि मृतदेह तिथेच टाकून पसार झाले. मात्र खून करताना अरुणचा मोबाईल फोन काढून घेण्यास ते दोघे विसरले. आणि तिथेच फसले. दिंडोशी पोलिसांनी मोबाईल फोन वरून तपास करून आरोपी कल्पेश अशोक कळंबे व त्याचा मित्र शाहनवाज इंतजार खान ऊर्फ सानू याला २७ मे रोजी या गुन्ह्यात अटक केली. या दोघांची चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी या दोघांना २४ तासात अटक करून या गुन्ह्यात कुठलाही पुरावा नसताना आरोपीच्या मुसक्या आवळल्या. ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त दिलीप सावंत, पोलीस उप आयुक्त डी. एस. स्वामी , स.पो.आ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व.पो.नि. धर्मेंद्र कांबळे याच्या देखरेखेखाली तपासी अधिकारी व पथक पो.नि. मनोहर शिंदे, स.पो.नि. विजय जाधव, दिग्विजय पाटील, पो.उप.नि. गणेश फड, स्वप्नील पाटील, घुले, मुंढरे, पो.हवा. तटकरे, पाटील, चौधरी, गुजर, वारे, पाटील, शिंदे, बुरडे, चव्हाण यांनी पार पाडली.

### मेव्हण्याचे लक्षण काही ठीक नाही दिसले...

बहिणीला समजून घेत होता. मात्र भागवतच्या वागण्यात सुधारणा व्हावी असे परमेश्वर यास नेहमी वाटत होते. त्यामुळे तो वारंवार मेहुणा भागवत यास समजावण्याचा प्रयत्न करत होता. त्यात त्याला यश येत नव्हते. विवाहीत बहिणीने माहेरी किती दिवस रहावे हा प्रश्न परमेश्वर यास सतावत होता. तो तिला समजावून सासरी पाठवून देत होता. मात्र काही दिवस झाले की त्याची बहिण पुन्हा माहेरी येवून रहात असे. या कारणामुळे परमेश्वर पारधी याच्या मनात मेहुणा भागवत पारधी याच्याबद्दल चिड निर्माण झाली होती. परमेश्वर याची आई मंगलाबाई प्रकाश आढारे या जामनेर तालुक्यातील नेरी बुद्रूक ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्य असून माजी उपसरपंच आहेत. जवळच असलेल्या चिंचखेडा बुद्रुक या गावी राहणा-या भागवत सोबत परमेश्वरच्या बहिणीचे लग्न झाले होते. बहिणीला त्रास देणाऱ्या मेहुण्याला अद्दल घडवण्याचा विचार शालक परमेश्वर याने मनाशी केला. त्याने मेहुणा भागवत यास २९ जुलैच्या रात्री ढाब्यावर जेवण करण्याच्या निमीत्ताने नेले. आज कोणत्याही परिस्थितीत भागवत यास कायमचे संपवण्याचा विचार परमेश्वर याने केला होता. त्यासाठी परमेश्वर याने सोबत चाकू देखील आणला होता. ढाब्यावर जेवण झाल्यानंतर वाटेत बोदवड रस्त्यावरील वाडी किल्ला घाटात परमेश्वर याने मेहुणा भागवत याचा खून केला. खून केल्यानंतर भागवतचा मृतदेह जवळच असलेल्या चारीत फेकून दिला. रक्ताने माखलेला चाकू सोबत घेवून त्यानंतर त्याने थेट जामनेर पोलिस स्टेशन गाठले. आपण आपल्या मेहुण्याचा खून केल्याचे त्याने पोलिसांजवळ कबुल केले. रक्षा बंधनापुर्वीच परमेश्वर याने आपल्या बहिणीचे कुंकू पुसण्याचे काम केले होते. खून केलेला आरोपी हातात माखलेला चाकू घेवून आल्याचे समजताच पोलिस देखील अवाक झाले. पोलिस निरिक्षक प्रताप इंगळे यांनी त्याची विचारपूस केली असता त्याने सर्व घटनाक्रम कथन केला. हा प्रकार डीवायएसपी इश्वर कातकाडे यांच्या कानावर घालण्यात आला. घटनास्थळावर जावून मृतदेहाची पाहणी तसेच पुढील कायदेशीर कारवाई करणे क्रमप्राप्त होते. मात्र मुसळधार पाऊस व रात्रीची वेळ असल्यामुळे घटनास्थळावर जाणे शक्य नव्हते. शेवटी दुस-या दिवशी सकाळी पाऊस थांबल्यानंतर पोलिस पथक घटनास्थळी परमेश्वर प्रताप पारधी यास सोबत घेवून गेले. बोदवड रस्त्यावरील वाडी किल्ला घाटात भागवत मोतीराम पारधी याचा मृतदेह पडलेला होता. त्याच्या गळयावर व पोटावर चाकूचे गंभीर वार दिसून येत होते. रस्त्यावरुन खाली चारीत फेकून देण्यात आलेल्या मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला. मयताचे वडील मोतीराम नथू पारधी यांच्या फिर्यादीनुसार संशयित परमेश्वर पारधी यांचेविरुद्ध भा.दं.वि. कलम ३०२, २०१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्हयाचा पुढील तपास अप्पर पोलीस अधीक्षक सचिन गोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे, सहायक निरीक्षक धरमसिंग सुंदरडे, विशाल पाटील, नीलेश घुगे, रमेश कुमावत, इस्माइल शेख, अमोल घुगे आदी करत आहेत.

क्राईम संध्या | सोमवार दि. १७ ऑगस्ट २०२० ते रविवार दि. २३ ऑगस्ट २०२० | लातूर/पालघर | www.crimesandhya.com | ३

# आरोग्य कर्मचाऱ्यांसोबत असहकार्याचे वातावरण खपवून घेतले जाणार नाही - डॉ. कैलास शिंदे



**पालघर/प्रतिनिधी**

कोरोना संकटाच्या काळात आरोग्य यंत्रणा दिवस-रात्र काम करत असून ग्रामपातळीवर आशा आरोग्य सेविका, आरोग्य सेवक यांना काम करावे लागते मात्र काही वेळेस नागरिकांकडून या कर्मचाऱ्यांसोबत गैरवर्तणूक केले जाते, त्यांना अनेकदा अपमानास्पद वागणूक तर काही वेळेस मारहाण केल्याचे प्रकार घडले आहेत. नागरिकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याऐवजी जर असे असहकार्याचे वातावरण निर्माण केल्यास त्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा आज जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी दिला. कोरोना विषाणूचा संसर्ग होणे बाधित होणाऱ्या रुग्णांचे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग वाढविण्याबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली होती त्यावेळी ते बोलत होते.

आ.सुनील भुसारा, मु.का.अ.जि.प.पालघर पोलीस अधीक्षक पालघर, नगराध्यक्षा पालघर, सहायक जिल्हाधिकारी डहाणू, जव्हार, उपविभागीय अधिकारी पालघर, वसई,वाडा तहसीलदार सर्व, गटविकास अधिकारी पं.स (सर्व) पोलीस निरीक्षक (सर्व), मुख्याधिकारी नगरपरिषद, नगर पंचायत (सर्व) तसेच सर्व तलाठी, सर्व जि.प.सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच व सर्व ग्रामसेवक उपस्थित होते. आरोग्य कर्मचारी यांना कामात येणाऱ्या अडचणींमुळे कोरोना रुग्ण शोधण्यास अडथळे येत असून असे सूरु राहिल्यास दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची व मृतांची संख्या वाढत जाईल असे सांगून आरोग्य कर्मचारी त्यांचे कर्तव्य पार पाडीत असताना नागरिकांकडून त्यांना मारहाण करण्यापर्यंत मजल जाते हे आपल्या जिल्ह्यासाठी भूषणावह नाही, असा खेद यावेळी जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केला. तसेच आपल्या गावात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी चाचणी करण्यासाठी येतात त्यावेळी संशयित रुग्ण आहेत त्यांनी पुढे येऊन स्वतःहून चाचणी केली पाहिजे जेणेकरून जास्तीत जास्त रुग्ण सापडतील त्यांच्या जीवितास होणारा संभाव्य धोका टाळता येईल, परंतु यात जर नागरिक अडथळा आणत असतील तर त्यावर पोलिसांनी योग्य ती कारवाई केली पाहिजे अशा सूचना आज जिल्हाधिकारी यांनी पोलीस अधीक्षक दत्तात्रय शिंदे यांना व्हीसी द्वारे दिल्या.

नागरिकांना लक्षणे दिसतात परंतु फिवर क्लीनिक मध्ये येत नाहीत, चाचणी करून घेत नाहीत त्यामुळे रुग्ण दगावण्याचे प्रमाण वाढत आहे, त्यामुळे मोठ्या ग्रामपंचायती व नगरपरिषदांनी मनुष्यबळ वापरून स्वतःचे फिवर क्लीनिक सुरू केले पाहिजे अशा सूचना मु.का.अ.जिल्हा परिषद व नगरपालिका स्तरावरून तशा सूचना देण्यात याव्यात असे आदेश यावेळी जिल्हाधिकारी यांनी दिले. तसेच ग्रामीण भागात सोशल मीडियाद्वारे काही अफवा पसरवल्या जातात, पूर्ण चाचणी करणा बाबत लोकांमध्ये जनजागृती नाही अशा वेळी सर्व नगरपरिषदा, नगरपंचायती, सर्व मोठ्या ग्रामपंचायती यांनी स्वतःचा निधी वापरून जनजागृती व प्रचार प्रसिद्धी केली पाहिजे, यात ऑनलाइन विविध स्पर्धा, वेगवेगळे व्हिडीओ तयार करणे यांचा समावेश असणे गरजेचे आहे असे असे सांगून जेथे नियमांचे पालन केले जात नाही अशा ठिकाणी आपल्या अधिकारांचा वापर करून मार्शल टीम तयार करणे, दंडवसुली करणे या गोष्टी करणे गरजेचे आहे असे जिल्हाधिकारी यांनी यावेळी स्पष्ट केले. जिल्हयात अधिकाधिक ठिकाणी चाचणी करण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्याचे प्रयत्न असून प्रत्येक नगरपालिकेत चाचण्या करता येतील तसेच ही चाचणी मोफत असून यासाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही, त्याचबरोबर रेमेडिसिविर आणि टोसिलिझुमॅब ही अद्यावत औषधे रुग्णांना मोफत दिली आहेत. आतापर्यंत २७०च्या आसपास इंजेक्शन उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे कुठल्याही प्रकारच्या अफवांना बळी न पडता चाचणी करून घेण्याचे आवाहन ही यावेळी जिल्हाधिकारी यांनी केले. तसेच उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींनी त्यांच्या जनसंपर्काच्या माध्यमातून जनतेमध्ये जनजागृती करावी अशी विनंती केली. या व्हीसी द्वारे ग्रामीण भागात कोरोना संदर्भात काम करताना येणाऱ्या अडचणी, सुविधा जाणून घेतल्या. तसेच वेळप्रसंगी स्वतः भेट देऊन समस्या जाणून घेणार असल्याचे सांगितले.

# उमेदच्या रुमा हस्तकारी गोधडी व्यवसायास मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांची भेट



**निलंगा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती निलंगा अंतर्गत तालुक्यातील उमेद अभियातील स्थापित अंसरवाडा येथील रुमा बचत गटास मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी भेट दिली. यावेळी रुमा हास्तकारी नावाने बचत गटाने सुरू केलेल्या महाराष्ट्राची पारंपारिक गोधडी व्यवसायास भेट देऊन व्यवसायबाबत माहिती घेतली व व्यवसायाच्या वृद्धीसाठी गटांतील महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी रुमा हास्तकारी व्यवसायाच्या विविध उत्पादनाची माहिती घेवून समाधान व्यक्त केले. या भेटी दरम्यान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा संतोष जोशी यांनी कृतीसंगम कार्यक्रमातून गटाला विविध शासकीय योजनांचा लाभ देऊन गटांना अर्थ सहायय करण्याबाबत प्राधान्य देण्यात येईल व व्यवसायाच्या वृद्धीसाठी जिल्हास्तवरून पूर्ण सहकार्य करण्यात येईल विश्र्वास व्यक्त केला. गट विकास अधिकारी अमोल ताकभाते यांना या कार्यामध्ये सर्वोपोतरी शासकीय मदत करण्याच्या संबंधितांना सूचना दिल्या. या वेळी जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे यांनी महाराष्ट्राची ही पारंपरिक मायेची गोधडी अमेझॉन व ऑनलाईन विक्री प्लॅटफॉर्म वर लिस्टिंग ची प्रगती व प्रॉडक्ट छायाचित्रण माहिती दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी ऑनलाईन प्लॅटफॉर्म, प्रॉडक्ट कॅटलॉग, वेबसाईट, ध्रीढ्रीलश चॅनेल सुरू करण्याच्या संबंधितांना सूचना दिल्या. सद्या उमेद अभियान मार्फत सुरू असलेल्या जागर अस्मितेच्या मोहिमेचा उपस्थित महिलांना मुख्यकार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक, जिल्हा अभियान व्यवस्थापक, गटविकास अधिकारी यांचे हस्ते अस्मिता प्लस सॅनिटरी नॅपकिन वितरण करून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हा अभियान व्यवस्थापक वैभव गुराळे , तालुका अभियान व्यवस्थापक भगवान अंकुश यांच्यासह तालुका व्यवस्थापक शरद समुखराव, अरुण शाहीर प्रभाग समन्वय गोविंद रावते, नितीन रोडे व त्रिंबक लहाने यांनी कार्यक्रम संपन्न करण्यासाठी परिश्रम घेतले.

# माजी मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांच्या स्मृती दिनानिमित्त रक्तदान शिबिर



**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील धनेगाव येथे लोकनेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै विलासराव देशमुख यांच्या ८ व्या स्मृती दिनानिमित्त रक्तदान करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी ४१ रक्तदात्यानी रक्तदान केले. सदरचे शिबीर भालचंद्र ब्लड बँकेच्यावतीने काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष सोनु डगवाले यांनी आयोजित केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सैनिक रावसाहेब खारे होते. तर या रक्तदान शिबिरामध्ये सैनिक हरी बिरादार यांनी पहिले रक्तदान केले. यावेळी तानाजी पाटील, राम भंडारे, सुभाष बिरादार, रामलिंग शेरे, बाळासाहेब बिरादार व भालचंद्र ब्लड बँक, लातूरचे कर्मचारी उपस्थित होते. शिबीर यशस्वीतेसाठी संगाप्पा चरपल्ले, जयंत पाटील, अमर बिरादार, अनंत बिरादार, महेश बिरादार आदीनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रणव बिरादार तर आभार सोनु डगवाले यांनी मानले.

# स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांना पालघर वासियांकडून अभिवादन



**पालघर/प्रतिनिधी**

चलेजाव चळवळीत सहभागी झालेल्या पालघर तालुक्यातील पाच स्वातंत्र्य सैनिकांना हौतात्म्य प्राप्त झाले होते. त्यांचे पुण्यस्मरण व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पालघर येथील हुतात्मा स्तंभ येथे आज त्यांना आदरांजली वाहण्यात आली. पालघरच्या नगराध्यक्षा डॉ. उज्वला काळे यांनी हुतात्मा स्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. हुतात्मा चौकाजवळ जिल्ह्यातील काशिनाथ हरी पागधरे (सातपाटी), गोविंद गणेश ठाकूर (नांदगाव), रामप्रसाद भीमाशंकर तिवारी (पालघर), सुकूर गोविंद मोरे (सालवड), रामचंद्र महादेव चूरी (मुरबे) यांना १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात याच दिवशी हौतात्म्य आले होते. यावेळी स्वातंत्र्य सैनिक, खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा, जिल्हा परिषद उपाध्यक्ष निलेश सांबरे, जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे, जिल्हा पोलीस अधीक्षक दत्तात्रय शिंदे, यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, तहसिलदार, विविध विभागांचे अधिकारी, नागरिक, आदींनी पुष्प अर्पण करुन हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यासाठी पालघर शहरातील बाजारपेठा आज बंद ठेवण्यात आल्या होत्या.

# अहमदपूर आगारातून प्रवाशांसाठी बस सेवा सुरू

**अहमदपूर/प्रतिनिधी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बससेवा बंद होती. शनिवारपासून ग्रामीण भागात एसटी बस सुरु झाली. बऱ्याच दिवसानंतर गावात बस आल्याने नागरिकांसह प्रवाशांतून समाधान व्यक्त होत होते. येथील स्थानकात जेष्ठ पत्रकार रामलिंग तत्तापूरे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. यावेळी आगार प्रमुख एस.जी. सोनवणे, पत्रकार संघाचे अध्यक्ष बासीद पठान, प्रा.बाबन आत्तार, प्रा. रत्नाकर नळेगावकर, सलीम सय्यद, प्रा.सादिक शेख, गजानन भुसारे, सचिन कोंडलवाडे, उदय गुंडिले, मासुम शेख, साबेर शेख, गोंविद काळे, मेघराज गायकवाड, इद्रिस सादिक आदींची उपस्थिती होती. अहमदपूर



आगाराच्या ५ बसेस ग्रामीण भागात धावल्या. लॉकडाऊनमुळे बससेवा बंद होती. त्यामुळे बसला आर्थिक फटका बसला आहे.

जिल्हा अंतर्गत तालुकास्तरावरुन बससेवा सुरु करण्यात आली आहे.तालुकास्तरावरुन ग्रामीण भागात बस केव्हा सुरु होणार याकडे प्रवाशांचे लक्ष लागून होते. शनिवारपासून बससेवा सुरु झाली आहे. यावेळी शासनाच्या नियमांचे पालन करीत अहमदपूर आगारातून ५ बसेसच्या फेऱ्या सुरु करण्यात आल्या. अहमदपूर ते अंधोरी मार्गे किनगाव, अहमदपूर ते कोपरा मार्ग किनगाव, अहमदपूर ते रोकडा सावरगाव, अहमदपूर ते सोरा मार्गे किनगाव, अहमदपूर ते शिवणखेड अशा एकूण ५ बसेस सुरु करण्यात आल्याचे आगार प्रमुख एस.जी. सोनवणे यांनी सांगितले.

# भिवंडीत जागतिक आदिवासी दिनानिमित्त रंगले ऑनलाईन कवी संमेलन

**भिवंडी** : जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील 'माझी आई प्रतिष्ठान' या सामाजिक संस्थेच्यावतीने झूम अँपच्या माध्यमातून रविवारी पडघा येथे ऑनलाइन कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या माध्यमातून आदिवासी संस्कृती जपण्याचा व आदिवासी संस्कृतीला उजाळा देण्याचे प्रयत्न करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक विजयकुमार भोईर होते. यावेळी आदिवासी संस्कृती व लढा तसेच आदिवासी जीवनावर कविता सादर करण्यात आल्या.



यामध्ये नरेश जाधव, ॲड. प्रज्ञेश सोनावणे, भटू जगदेव, नवनाथ रणखांबे, अशोक कांबळे, अजिंक्य म्हस्के, मिलिंद जाधव, संघरत्न घनघाव, मारुती कांबळे, विष्णू खांजोडे, राष्ट्रपाल काकडे, विजयकुमार भोईर, ॲड. श्रीकृष्ण ठोंबरे, रविंद्र आडके आदी कवींनी स्वरचित कविता सादर करून प्रबोधन केले. आदिवासी संस्कृतीला उजाळा मिळाला पाहिजे. म्हणून आम्ही कवितेच्या माध्यमातून आदिवासी संस्कृतीची ओळख कवितेतून मांडणी केली आहे, असे कवी अध्यक्ष विजयकुमार भोईर यांनी बोलतांना सांगितले.

# स्वातंत्र्यसैनिकांचा राष्ट्रपतींच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार

**पालघर/प्रतिनिधी**



ऑगस्ट क्रांती दिनांचे औचित्य साधून पालघर जिल्हाधिकारी कैलास शिंदे यांनी जव्हार शहरातील स्वातंत्र्यसैनिक रविंद्र (भाई) वैद्य, अंबादास मेतकर व स्वतंत्र सैनिक कै. सदाशिव घोलप यांच्या पत्नी रेणुका घोलप यांचा घरी जाऊन शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

राष्ट्रपती महोदयांनी केलेल्या सुचनेनुसार आपले कर्तव्य समजुन आंम्ही घरी जाऊन स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार करीत आहोत, देशापरी त्यांनी केलेले कार्य महाण आहे त्यांचा सत्कार करणं हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. असे प्रतिपादन यावेळी जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी यावेळी केले. या प्रसंगी सहाय्यक जिल्हाधिकारी प्रजित नायर, तहसिलदार संतोष शिंदे आदी शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# मंद्रुप पोलिसांनी दोन लाखांचा गुटखा पकडला

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मोहोळकडे जाणाऱ्या, कर्नाटकातून महाराष्ट्रामध्ये अवैधरित्या आणला जाणारा तब्बल २ लाख १२ हजार ३६० रुपयांचा गुटखा मंद्रुप पोलिसांनी जप्त केली आहे. यावेळी कारसह एकूण ९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे पदभार घेतल्यावर कारवाईचे सत्र सुरु केल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी गणेश रामचंद्र माळी (२३) याच्यावर मंद्रुप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे यांना कर्नाटक राज्यांतून एका महिंद्रा कंपनीच्या कार (एमएच १३ डीएम ३०००) यातून मंद्रुप मार्गे गुटखा भरून नेत असलेले कार, मोहोळ तालुक्यात विक्रीसाठी आणण्यात येणार असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानंतर त्यांनी पोलीस कर्मचारी संजय कांबळे व चंद्रकांत सुतार यांना कारवाई करण्यासाठी पाठविले. यावेळी चौकशी करून गाडीची तपासणी केली असता या कारमध्ये सुगंधी तंबाखू, विमल पान मसाला २३ बॅग १ लाख ४४ हजार ९०० रुपये, आरएमडीपान मसाला ८० पॉकेट ६२ हजार ९६० रुपये, सिगारेटचे बॉक्स ४५०० रुपयांची असा सुमारे दोन लाखांचा मुद्देमाल आढळून आला आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### जव्हारमध्ये ३३७ मिमी पावसाची नोंद

जव्हार : जव्हार तालुक्यात जून व जुलै महिन्यात पावसाने विश्रांती घेतली होती, मात्र ऑगस्टमध्ये दमदार हजेरी लावल्याने परिसर जलमय झाले आहेत. शुक्रवारी एका दिवसात तब्बल ३३७ मिमी पावसाची विक्रमी नोंद करण्यात आली. जव्हारकरांना पाणीपुरवठा करणारे जयसागर धरणही पूर्ण भरले असल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. जव्हार तालुक्यात शुक्रवारी जामसर भागात १५७ मिमी, साखरशेत भागात ९७ मिमी, तर जव्हार भागात ८३ मिमी अशी दिवसभरात ३३७ मिमी इतक्या विक्रमी पावसाची नोंद करण्यात आली. शुक्रवारपर्यंत सरासरी ४३६.७ मिमी पावसाची नोंद झाली. पालघर जिल्ह्यात शुक्रवारी ६२६.५ मिमी पावसाची नोंद झाली. दरवर्षीप्रमाणे जून व जुलै महिन्यांतच जव्हारचे धरण भरते, यंदा ते भरण्यासाठी ऑगस्ट महिना उजाडला. पाऊस कमी पडत असल्याने जव्हारकरांची पाण्याची समस्या वाढली होती, मात्र मागील काही दिवसांपासून पावसाने जोर धरल्याने आनंदाचे वातावरण आहे.

### विश्व सुपर मार्केटला मिळाली नुकसान भरपाई

लातूर : आग लागून बार्शी रस्त्यावरील विश्व सुपर मार्केटचे नुकसान झाले होते.याप्रकरणी नॅशनल इन्शुरन्स कंपनीने तात्काळ विमा भरपाई दिली. याबद्दल गुरुनाथ मगे यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांचे आभार मानले. बार्शी रस्त्यावर विश्र्व सुपर मार्केटचे मोठे दालन आहे. दि.२० जून रोजी शॉर्टसर्किटमुळे आग लागून या दालनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. विश्व सुपर मार्केटने ही इमारत आणि आतील साहित्याचा विमा उतरवलेला होता. आग लागून नुकसान झाल्यानंतर त्याच्या भरपाईसाठी कंपनीकडे अर्ज करण्यात आला होता. त्यानुसार कंपनीने विश्व सुपर मार्केटला तात्काळ विमा भरपाई मिळवून दिली. याबद्दल विश्व सुपर मार्केटचे संचालक गुरुनाथ मगे यांनी नॅशनल इन्शुरन्स कंपनीचे विभागीय व्यवस्थापक जीवन कुलकर्णी, शाखा व्यवस्थापक विजय पस्तापुरे, सहाय्यक व्यवस्थापक शिवकुमार खुब्बा, विशाल पवार, सुनिल आवारे, आर.एम.सुर्यवंशी यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत. आग लागल्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी मदत करणाऱ्या महापालिकेच्या अग्निशमन दलाचेही त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

### समीर लिमयेंच्या व्याख्यानास उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : आदर्श पिढी घडवणाऱ्या गुरुजनांसाठी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने आयोजित कॉर्पोरेट कीर्तनकार समीर लिमये यांच्या ऑनलाईन व्याख्यानास शेकडो शिक्षकांनी प्रतिसाद दिला. लातूर, उस्मानाबाद, बीड जिल्ह्यांसह अमेरिकेतूनही सदस्यांनी या उपक्रमात ऑनलाईन सहभाग नोंदवला. कोरोनामुळे यावर्षी शिक्षण क्षेत्रालाही फटका बसला आहे. शाळा बंदच असून ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. त्यामुळे लॉकडाऊनच्या काळात रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने शिक्षकांसाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. समीर लिमये हे कॉर्पोरेट कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. दासबोधाचेही ते अभ्यासक आहेत. विविध कॉर्पोरेट फिल्म्स, डॉक्युमेंटरी फिल्म्स,व्यक्तिमत्व विकासाच्या संकल्पना, लेखन याविषयात त्यांचा हातखंडा आहे. कॉर्पोरेट कीर्तन या त्यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे देशासह परदेशातही अनेक प्रयोग झालेले आहेत. मन, मेंदू आणि मनगट या विषयावर त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. झूम अॅप आणि फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून हा कार्यक्रम संपन्न झाला.यासाठी नोंदणी केलेल्या शिक्षकांना झूमचा मिटींग आयडी आणि पासवर्ड पाठवण्यात आला होता. राजेश जोशी यांनी अमेरिकेतून तर आणखी ५ जणांनी दुबईतून सहभाग नोंदवला. लिमये यांनी व्याख्यानात दासबोधाचे दाखले देवून शिक्षकांनी अध्यापन कसे करावे यासंदर्भात विचार मांडले. शिक्षकांनी लिखाणावर भर द्यावा. दररोज काहीतरी लिहावे. ते शक्य नसेल तर किमान सतत वाचन करावे, पाठांतर खुप असावे. शिक्षक प्रयोगशील असावा असे मतही त्यांनी मांडले. रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष अनुप देवणीकर, सचिव रविंद्र बनकर, लिटरसी डायरेक्टर जगदीश कुलकर्णी, प्रोजेक्ट चेअरमन धनश्री किरण यांच्यासह रोटरीच्या सदस्यांनी या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

### प्रेरणा दिना निमित्त वृक्षारोपण

लातूर : लातूर वृक्ष चळवळी व वन विभागाच्या वतीने विकासरत्न विलासराव देशमुख वन येथे लातूरवृक्ष चळवळी तर्फे श्रमदानातून वड, पिंपळ, कवट, कडुलिंब, आपटा, पळस, कदंब असे १०१ झाडे लावण्यात आली. विलासराव देशमुख वन येथे हा घनदाट वृक्ष प्रकल्प आहे. लातूर वृक्ष चळवळी तर्फे मागिल ६/७ वर्षापासून लातूर जिल्हयात वृक्षसंवर्धन व्हावे या उद्दिष्टाने कार्य सुरु आहे. वृक्ष निसर्ग या विषयी प्रेम वाढावे म्हणून वृक्ष चळवळ सुरू करण्यात आली आहे. आज प्रेरणा दिनानिमित्त लातूर जिल्यातील सर्व जुने वृक्ष जतन व्हावे व ते नविन पिढीसाठी प्रेरणा देणारे बनावेत असे आवाहनही यावेळी करण्यात आले. यावेळी पर्यावरण तज्ञ अतुल देऊळगावकर, यशवंतराव पटील, कृषी अधिकारी रमेश चिल्ले, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.बी.आर.पाटील प्रतिभाताई गोमसाळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले एकुण २.५ एकरात हा घनदाट वन पसरलेला आहे. पर्यावरणाचा समतोल कायम राखण्यासाठी जंगल गरजेचे आहे. लातूर वृक्ष चळवळी तर्फे अलिकडच्या काळात अशी छोट छोटी जंगल निर्मिती करुन ते नविन पिढीला दिशादर्शक व माहिती देणारे केंद्र बनवण्यासाठी हे कार्य हाती घेण्यात आले आहे. आता फक्त मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करता येणे शक्य असून यातून आपले ग्रीन कव्हर वाढवूनच दुष्काळावर मात करता येऊ शकते. असे लातूर वृक्षचे समन्वयक सुपर्ण जगताप म्हणाले यावेळी सौ सुनंदा जगताप, वन विभागाचे एस जी तोरकडे,एम वाय पवार, श्री भालेराव, लातूर वृक्षचे बालाजी चामे, जयवंत भालेराव, प्रसाद पाटील ह्यानी श्रमदान केले.

# निष्ठूर लोकप्रतिनिधी

एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ अशी आपली हिंदू संस्कृती आहे. खास करून संकटाच्या काळात एखाद्या माणसाला जर मदत केली, तर त्यातून पुण्य पदरात पडते असे सांगितले जाते. पण आजकाल जग इतकं स्वार्थी बनल आहे की आपण आणि आपल्या कुटुंबाच्या पलीकडे कुणीही बघायला तयार नाही. त्यामुळे ज्या लोकांना मदतीची गरज आहे, अशांवर तडफडून मारण्याची पाळी आलीय. लॉकडाऊनच्या काळात सर्वत्र हेच बघायला मिळाले. कारण लॉकडाऊनमध्ये उद्योगधंदे बंद झाल्यामुळे लोकांवर उपासमारीची पाळी आली. त्यामुळे काही लोकांनी आपल्या मुलाबाळांचा स्वतःच्या हाताने गळा दाबून त्यांना ठार मारून स्वतःही आत्महत्या केली. तोच प्रकार आजारी माणसांच्या बाबतीत घडतोय. ज्या गरीब रुग्णांचे मुंबईच्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत त्यांना गेल्या साडेचार महिन्यांपासून मुंबईला जाता आलेले नाही. कारण त्यांच्यासाठी लोकल ट्रेनची सुविधा उपलब्ध नाही. गेल्या महिन्यांपासून लोकल ट्रेन सुरु करण्यात आलीय, पण ती फक्त अत्यावश्यक सेवेतील लोकांसाठीच असल्याने त्यातून गंभीर आजारी रुग्णांना प्रवासाची मुभा नाही. बरे मुंबई उपनगरे तसेच ठाणे पालघर जिल्ह्यात खाजगी रुग्णालये आहेत. पण तिथले उपचार गोरगरीब माणसाला परवडणारे नाहीत. त्यामुळे हे गोरगरीब रुग्ण पूर्णपणे मुंबईतील केईएम, जे.जे., नायर यासारख्या मोठ्या सरकारी रुग्णालयावर अवलंबून असतात. पण लोकल ट्रेन चालू असूनही त्यांना लोकल मधून प्रवासाची मुभा नसल्याने त्यांना मुंबईत जाता येत नाही, परिणामी उपचार मिळत नसल्याने लोकांवर घरातच तडफडून मरण्याची पाळी आलीय आणि हीच बाब एका हार्टच्या पेशंटने शिवसेनेच्या खासदाराला समजून सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्याने ऐकूनच घेतले नाही. तुम्ही हार्टचे पेशंट असाल तर रुग्णवाहिका करून जा, असे उर्मट उत्तर दिले. विरारवरून रुग्णवाहिका करून मुंबईत जाण्याची आर्थिक क्षमता जर त्या रुग्णाची असती तर त्याने विरार मधल्या खाजगी रुग्णालयातच उपचार केले नसते का? म्हणजे संकटाच्या काळात सुद्धा हे लोकप्रतिनिधी जनतेशी कसे वागतात याचे हे जिवंत उदाहरण आहे. लॉकडाऊनच्या साडेचार महिन्यांच्या काळात गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या किती रुग्णांना या लोकप्रतिनिधींनी मदत केली हा खरोखरच संशोधनाचा विषय आहे. निवडणूक प्रचारावर करोडो रुपये खर्च करणारे हे आमदार, खासदार आज संकटाच्या काळात जर आजारी लोकांशी इतक्या निष्ठुर पणे वागू लागले तर त्यांनी मदतीसाठी कोणाकडे पहावे? लोकप्रतिनिधी हे लोकांच्या मदतीसाठी असतात. त्यामुळे कोरोनच्या संकट काळात प्रतेक लोकप्रतिनिधीने त्याच्याकडे मदतीसाठी येणाऱ्या गरजवंताला मदत करायला हवी आणि खास करून कॅन्सर, हार्ट, ब्रेन, किडनी, प्यारलेस या सारख्या गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना तर मदत करायलाच हवी, पण ज्या लोकप्रतिनिधींनी एका गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णाची समस्या व्यवस्थित एकुनही घेतली नाही. तो शिवसेनेचा लोकप्रतिनिधी कसा होऊ शकतो. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे शिवसेनेचे धोरण आहे. असे असताना जेंव्हा शिवसेनेचा एक जबाबदार खासदार एका हार्टच्या पेशंटला मदत करायला नकार देतो त्याची समस्या व्यवस्थित समजूनही घेत नाही, तेंव्हा मात्र शिवसेनेत खूप मोठा बदल झालाय याची जाणीव होते. त्याच बरोबर आजची शिवसेना ही बाळासाहेबांची शिवसेना राहिलेली नाही याची सुद्धा प्रचिती येते. बाळा साहेब ठाकरे यांच्या काळातील शिवसेना जनतेसाठी समर्पित होती. त्यामुळे एखाद्या माणसावर जर अन्याय झाला तर तो पोलिसांकडे जाण्याऐवजी शिवसेनेच्या शाखेत न्याय मागायला जायचा आणि तिथे त्याला हमखास न्याय मिळायचा. इतकी लोकांमध्ये शिवसेने विषयी विश्वासाची भावना बाळासाहेबांनी निर्माण केली होती. पण बाळासाहेबांच्या पश्चात शिवसेनेत जो बदल झाला तो सामान्य माणसाला अचंबित आणि निराश करणारा होता आणि त्यातूनच कर्तव्य भावना विसरलेले लोक प्रतिनिधी शिवसेनेत उदयास आले. त्यामुळे अशा लोकांकडून गोरगरीब माणसांनी आजारी रुग्णांनी काय अपेक्षा बाळगायचा? आज खऱ्या अर्थाने बाळासाहेबांची लोकांना उणीव भासू लागलीय. कारण भलेही बाळासाहेब सत्तेच्य जवळपास फिरकलेले नसले तरी त्यांनी सतेत नसतानाही जे करून दाखवले ते सतेत असणाऱ्या लोकांनाही जमले नाही. आणि आत्ता तर शिवसेना सतेत आहे अशावेळी सेने कडून मराठी माणसांना खूप अपेक्षा आहेत, मात्र सेनेचे लोकप्रतिनिधी जर गरीब गरजू आजारी लोकांशी फटकून वागू लागले तर कसे होणार? ज्या हार्ट पेशंटने सेनेच्या त्या खासदाराकडे आपली कैफियत मांडली होती ती त्याची एकट्याची नव्हती तर त्याच्या सारख्या हजारो गंभीर आजारी रुग्णांची ती व्यथा होती. पण ती समजून घ्यायला संवेदनशील माणसाचं हृदय असावं लागत. पण आजकालचे पुढारी पैसा असल्याने इतके मुजोर झालेत की त्यांच्या संवेदना कुठल्या कुठे लुप्त झाल्या आहेत, त्यांच्यासाठी गोरगरीब सामान्य माणूस हा केवळ एक मतदार असतो आणि त्याच्याशी फक्त निवडणूक कळताच संबंध ठेवायचा असे नेते मंडळीनी जणू काही ठरवलेले आहेत. म्हणूनच ते आजारी माणसाशी सुद्धा फटकून वागतात. स्वतंत्र भारताच्या ७४ वर्षांच्या इतिहासात लोकशाही ही आता लोकांसाठी राहिलेली नाही. त्यामुळे त्यांनी जसे असाल त्याच स्थितीत राहायचे आणि त्या स्थितीत जगणे जमत नसेल तर खुशाल आत्महत्या करावी तेच सामान्य माणसासाठी सोयीस्कर ठरू शकते.

# पार्थचा नेमका सारथी कोण?

राजकारणात कधी काय घडेल याचा नेम नाही. कारण राजकारणात कुणीही कुणाचा कायमचा मित्र अथवा कायमचा शत्रू नसतो. त्यामुळे इकडचे तिकडे आणि तिकडचे इकडे असे नेहमी होताच असतात. याचे मुख्य कारण म्हणजे राजकारणात निष्ठा आणि नितिमत्ता हा प्रकारच नसतो. त्यामुळे या दोन्ही गोष्टी एखाद्या पुढाऱ्यांच्या कुटुंबात तरी का दिसव्यात? त्यामुळे कुणी किती जरी सांगितलं की आमच्या कुटुंबात कोणतेही मतभेद नाहीत तरी त्यावर कुणीही विश्वास ठेवू शकत नाही. सध्या पवार कुटुंबात जे काही चाललं आहे त्यातून त्यांच्यात सार काही आलबेल आहे असं म्हणता येणार नाही. त्याच बरोबर नेते मंडळीनी आपल्या पोरा बाळांना राजकारणात आणताना त्यांनी आपल्याच पावलावर पाऊल टाकून पुढे जायला हवे अशा अवास्तव अपेक्षाही बाळगू नये. वारसा हक्काने मिळालेल्या सगळ्याच गोष्टी काही टिकत नाही आणि टिकवताही येत नाहीत. पवार कुटुंबियांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास शरद पवार यांनी आजवर देशाच्या राजकारणात जे काही चढउतार पाहिलेत. त्यातून त्यांच्या गाठीशी मोठा अनुभव आहे आणि याच अनुभवातून त्यांनी आपली मुलगी असो किंवा पुतण्या यांना राजकीय दृष्ट्या तयार केले. आज सुप्रिया आणि अजितदादा यांच्याकडे परिपक्व राजकारणी म्हणून पाहिले जाते. राजकारणात संघटनात्मक पातळी पासून सत्तेच्या राजकारणापर्यंत त्यांनी शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या आहेत आणि त्यांच्या कामाबाबत शरद पवारही समाधानी आहेत.

सुप्रिया आणि अजितदादा सहसा पवारांच्या शब्दाबाहेर कधीही गेले नाहीत. पण त्यांच्या पुढच्या पिढीने मात्र मर्यादा ओलांडल्या. अजितदादांचा मुलगा पार्थ पवार याने ज्या पद्धतीने प्रतिगामी शक्तींना मदत होईल अशी भूमिका घेतलीय, ते पाहता पवारांना मानसिक त्रास होणे स्वाभाविक आहे. कारण पवार आयुष्यभर धर्मनिरपेक्षता जोपासत प्रतिगामी शक्तींशी लढले. त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात त्यांची एक विश्वसनीयता आहे. अशावेळी त्यांच्याच कुटुंबातील एका तरुणाने प्रतिगामी शक्तींची पाठराखण करण्याचा प्रयत्न करणे चुकीचे होते. पण पार्थ पवार यांनी राम मंदिर भूमिपूजन सोहळ्याला पाठींबा देताना पत्र पाठवून या सोहळ्याचे आणि आयोजकांचे जे गुणगान गायले ते पवार कुटुंबियांच्या मूळ ध्येय धोरणाच्या विरोधात होते. म्हणून तर पवार संतप्त झाले आणि पार्थच्या बोलण्याला कवडीचीही किंमत नाही असे त्यांनी



स्पष्ट केले. कोण हा पार्थ? त्याच्या नावाच्या पुढे असलेले पवार हे आडनाव काढले तर या पार्थला खरोखरच महाराष्ट्राच्या राजकारणात कवडीची तरी किंमत राहील का? बापामुळे याला लोकसभा निवडणुकीचे

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

तिकीट मिळाले, पण तिथे त्याचा दारुण पराभव झाला. कारण जी राजकीय समज आणि परिपक्वता रोहित पवार याच्याकडे आहे ती पार्थकडे नाही. म्हणून लोकांनी त्याला नाकारले आणि विधानसभा निवडणुकीत प्रथमच निवडणूक लढविणाऱ्या रोहितला स्वीकारले. कदाचित याच गोष्टीचा पार्थच्या मनात राग किंवा आसुया असावी, म्हणून त्याने थेट आपल्या आजोबांच्या विरोधात भूमिका घेतली आणि पवार कुटुंबात फूट पडावी म्हणून देव पाण्यात बुडवून बसलेल्या भाजपवाल्यांना त्याचा आनंद झाला. पण पार्थच्या खांद्यावर बंदूक ठेवून शरद पवारांना टार्गेट करणे वाटते तितके सोपे नाही. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात पार्थ हा गुळगुळीत गोटा आहे आणि अशा गोट्याच्या मदतीने भाजप बारामतीवर वार करण्याची स्वप्न बघत आहेत. पण ही स्वप्न कधीच पूर्ण होणार नाहीत. कारण पार्थ हा महादेव जानकर आणि गोपीचंद पडळकर यांच्या पेक्षाही गुळं गुळीत आहे, तो कधी कुठे आणि कसा घरंगळत जाईल याचा नेम नाही. कारण राजकारणात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी कर्तृत्व लागत ते पार्थ कडे नाही आणि मुख्य म्हणजे पवारांनी महाराष्ट्रात जी पुरोगामी विचारधारा रुजवली आहे तिची पाळेमुळे इतकी घट्ट आहेत की पार्थ सारख्यांना ती हलवण्यास दहा जन्म घ्यावे लागतील. तेंव्हा पार्थचं कुणीही सार्थी असो महाराष्ट्राच्या राजकारणात जोवर पवारांच्या सारखे भीष्म पितामह आहेत, तोवर पार्थ सारख्या पार्कमध्ये बागडणाऱ्या पोरा बाळांच्या जीवावर नवे महाभारत निर्माण करण्याचा भाजपचा प्रयत्न कदापि यशस्वी होणार नाही.

(मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३)

# गोष्ट प्लाझ्मा थेरपीची...

## दिशायन

करोना महामारी ही जग गिळंकृत करेल की काय अशी भिती वाटू लागली. जगातील बलाढ्य देशही करोना विषाणूपुढे नतमस्तक झाले. आरोग्य व्यवस्था, त्याला लागणारी यंत्रणा, यासाठी लागणारे संशोधन याबाबतची उदासीनवृत्ती किती महागात पडू शकते हे समजले. आज या साथीच्या रोगावर रामबाण औषध, उपचार पद्धती शोधण्यासाठी सगळे देश, संशोधक, तज्ज्ञ दिवसरात्र एक करत आहेत. सध्या भारतात करोना बाधितांवर प्लाझ्मा थेरपीचे उपचार होत आहेत. या थेरपची जोरदार चर्चा जगभरात होत आहे.

करोनामुळे गंभीर आजारी असलेल्या रुग्णांना करोनातून बऱ्या झालेल्या रुग्णांच्या रक्तातील प्लाझ्मा दिला जातो. करोना आजारातून बऱ्या झालेल्या व्यक्तीची प्रतिकारशक्ती वाढलेली असते. अशा व्यक्तीच्या शरीरामधील रक्तातील प्लाझ्मा संक्रमित व्यक्तीला दिल्यास त्या व्यक्तीचीही प्रतिकारशक्ती वाढेल. ही प्लाझ्मा थेरपीची संकल्पना आहे. ज्याचे मूळ नाव कॉन्वालेसंट प्लाझ्मा थेरपी असे आहे.

भारतात सुरुवातीला केरळमध्ये प्लाझ्मा थेरपीचा प्रयोग झाला. 'श्री चित्र तिरुमल इन्स्टिट्यूट फॉर मेडिकल सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी' या हॉस्पिटलने यासाठी पुढाकार घेतला. त्यानंतर एप्रिलपासून महाराष्ट्र आणि इतर करोनाचे रुग्ण जास्त असलेल्या राज्यांमध्ये प्लाझ्मा उपचार पद्धतीचा वापर करण्यास केंद्र शासनाने परवानगी दिली. केरळच्या टास्क फोर्सचे सदस्य आणि क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट डॉ. अनुप कुमार यांनी अहवाल दिला होता की एका डोनरच्या माध्यमातून चार कोव्हिड-१९ चे रुग्ण बरे होऊ शकतात.

माणसाच्या शरीरात विषाणू शिरला की शरीर त्याला बाहेर काढण्यासाठी खूप प्रयत्न करते. विषाणू आणि शरीरात होणाऱ्या या लढाईत अँटीबॉडी हे आपले योद्धे असतात. एका विशिष्ट विषाणूला मारण्यासाठी आपले शरीर विशिष्ट प्रकारच्या अँटीबॉडीज तयार करते. या अँटीबॉडीज आपल्या रक्तातल्या प्लाझ्मामध्ये असतात. कोव्हिडमधून बऱ्या झालेल्या व्यक्तीच्या शरीरात कोरोनाशी लढू शकणाऱ्या अँटीबॉडीज मुबलक असतात. त्या काढून कोरोनाशी लढणाऱ्या एखाद्या वृद्ध व्यक्तीच्या शरीरात सोडल्या तर मग त्या वृद्ध व्यक्तीचे शरीर कोरोनाशी चांगल्या पद्धतीने दोन हात करू शकते. या उपचार पद्धतीला अमेरिकेच्या अन्न आणि औषध



प्रशासनानेदील मान्यता दिली होती.

कॉन्वालेसंट प्लाझ्मा थेरपी ही १८८२ मधील पॅसिव्ह इम्युनिटी या संकल्पनेवर आधारीत आहे. आपल्याला माहितीच आहे की आजारांवर लस शोधताना त्याचे प्रयोग प्रथम प्राण्यांवर केले जातात. क्षयरोग किंवा कुष्ठरोगाच्या आजारांसाठी बीसीजी लस उपयोगी पडते. या लसीची निर्मिती करताना अॅण्टिबॉडीज घोड्यामध्ये विकसित करण्यात आल्या होत्या. मग त्या माणसाला टोचण्यात आल्या. यामुळे माणसातली रक्तपेशींची प्रतिकारशक्ती वाढण्यात मोठी मदत होते.

ग्युटन आणि हॉल यांच्या वैद्यकशास्त्राच्या अभ्यासक्रमातील पुस्तकांमध्ये नमूद केले आहे की या दुसऱ्या माणसाच्या शरीरातील अँटीबॉडीज रुग्णाच्या शरीरात दोन ते तीन आठवडे टिकून राहू शकतात. तर प्राण्याच्या शरीराक विकसित केलेल्या अँटीबॉडीज रुग्णाच्या शरीरात काही तास राहू शकतात. या काळात रुग्णाचे त्या रोगापासून संरक्षण होते. या प्रकाराच्या रक्तप्रदानाला पॅसिव्ह इम्युनिटी असे म्हणतात.

पॅसिव्ह इम्युनिटीवर आधारीत कॉन्वालेसंट प्लाझ्मा थेरपीचा प्रभावी वापर संसर्गजन्य रोगांमध्ये करण्यात आला आहे. १९१८ मध्ये पहिल्या महायुद्धाच्यावेळी स्वाईन फ्ल्यू आजार पसरला होता. हा आजार रोखण्यासाठी प्लाझ्मा थेरपीचा वापर करण्यात आला होता. २००९ ते २०११ दरम्यान विविध देशांमध्ये एच१ एन१ अर्थात स्वाईन फ्ल्यूने पुन्हा डोके वर काढले होते त्यावेळी देखील प्लाझ्मा थेरपी वापरली गेली होती. १९७६ आणि २०१५ मध्ये ईबोला संसर्गाने थैमान घातला होता. त्यावेळीदेखील प्लाझ्मा थेरपीचा वापर केला होता. त्यामुळे ही थेरपी यापूर्वीच तपासली गेली होती. तरी या सर्व संसर्गापेक्षा कोव्हिड १९ हा संसर्ग घातक आहे. म्हणून या थेरपीचा वापर सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर केला गेला.

करोनापासून बचाव करण्यासाठी प्लाझ्मा थेरपीचा वापर भारताआधी चीन आणि इंग्लंडमध्ये प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आला होता. भारतात या थेरपीचा प्राथमिक प्रयोग यशस्वी झाल्यानंतर अमेरिकेतही प्लाझ्मा थेरपीला सुरुवात झाली. पश्चिम आशियातील टर्की देशामधले डॉ. कुर्सत डेमिर हे प्लाझ्मा दान करणारे पहिले व्यक्ती ठरले आहेत. त्यांना करोना बाधित रुग्णांवर उपचार कताना त्यांनाही करोना झाला. करोनातून पूर्णपणे बरे झाल्यावर त्यांनी आपाले रक्तदान करून प्लाझ्मा डोनेट केला. इंग्लंडचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनाही करोनाचे संक्रमण झाले होते. त्यांच्यावर उपचार करताना प्लाझ्मा थेरपीचा वापर करण्यात आला होता. त्यानंतर ते ठणठणीत बरे झाले.

**प्लाझ्मादान करणाऱ्या व्यक्तींसाठी असलेले निकष**

- दान करणाऱ्या व्यक्तीने कोव्हिड-१९ शी यशस्वी लढा दिलेला असणे गरजेचे आहे.
- दान करणारी व्यक्तीचे सलग दोन करोना अहवाल निगेटीव्ह आल्यानंतर ते पूर्ण बरी झाल्यावर १४ दिवसांनी रक्त देऊ शकते.
- प्लाझ्मा दान करणाऱ्या व्यक्तीने गेल्या तीन महिन्यात परदेश प्रवास केलेला नसावा.
- त्या व्यक्तीला ताप किंवा श्वसनाशी संबंधित विकार नसावेत.

सध्या प्लाझ्मा थेरपी काही अंशी यशस्वी होताना दिसत आहे. दिल्ली, मुंबईत ही थेरपी यशस्वी झाल्याचे अहवाल समोर आले आहेत. मात्र ही थेरपी प्रत्येक रुग्णावर यशस्वी उपचार करते असे नाही. सुरुवातील करोनामुक्त व्यक्तीच्या शरीरातील अँटीजेनचे प्रमाण तपासता येत नव्हते. पण आता अँटीजेन तपासण्यासाठी काही चाचण्याही आल्या आहेत. तसेच या अँटीबॉडीज जमा करून ठेवण्यासाठी अनेक बड्या खाजगी लॅब कंपन्याही पुढे आल्या आहेत. पालिका आणि राज्यशासनानच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ते काम करत आहेत. शहरात मोक्याच्या ठिकाणी प्लाझ्मा दान करण्याची केंद्रे उभारण्यात आली आहेत. मुंबईतील मोठ्या गणेश मंडळांनी यंदा गणोशोत्सवाचे स्वरुप लहान करत रक्तदान, प्लाझ्मा दान सारख्या शिबीरांचे आयोजन करणार असल्याचे घोषित केले आहे.

# लातूर महापालिका करतेय ५९३ कोरोना बाधितांवर उपचार

## नव्या ५०० बेड ची सुविधा लवकरच विकसित करण्यात येणार

पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेवरून लातूर महापालिकेच्या वतीने शहरातील बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, समाज कल्याण विभाग कव्हा रोड, पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतन औसा रोड या ३ ठिकाणी स्वतःचे कोविड केअर सेंटर विकसित करण्यात आले असून सध्या तेथे ५९३ कोरोना बाधित रुग्णांवर उपचार सुरू आहेत. महापौर विक्रांत गोजमगुंडे, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी या केंद्रास भेट देऊन रुग्णांची विचारपूस केली. शहरात कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढू नये यासाठी महापालिकेच्यावतीने प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिला जात आहे.कोरोनाचा प्रादुर्भाव कमी व्हावा यासाठी पालिकेच्या वतीने नागरिकांच्या प्रबोधना सोबतच प्रसंगी दंडात्मक कारवाईही केली जात आहे.शहराला कोरोनामुक्त करण्यासाठी तपासण्यांची संख्या वाढवण्यात आली आहे. त्यासाठी विशेष तपासणी केंद्रही पालिकेने सुरू केली आहेत. कोरोनाबाधित रुग्ण आढळल्यानंतर त्याच्यावर उपचारासाठी पालिकेने विकसित केलेल्या कोविड सेंटर येथे अनुक्रमे बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय ३०५, समाज कल्याण विभाग कव्हा रोड २१०, पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतन औसा रोड ७८ कोरोना बाधित रुग्ण उपचार घेत आहेत. विलासराव देशमुख शासकीय रुग्णालयासह खाजगी रुग्णालयातही प्रभावीपणे उपचार केले जात असताना बेडची कमतरता भासू नये यासाठी महनगरपलिकेच्या हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात आज रोजी सौम्य लक्षणे असणाऱ्या एकूण ५९३ रुग्णांवर उपचार केले जात आहेत. सर्व प्रकारच्या अद्ययावत सोयी- सुविधा या सेंटरमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच १० ऑक्सिजन बेडची सुविधाही येथे उपलब्ध आहे. उपचार घेत असलेल्या रुग्णांना दोन वेळचे जेवण, काढा, नाश्ता, औषध उपचार व रक्त तपासणी च्या सुविधा मनपाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.यात भर टाकत लवकर आणखी ५०० बेड ची सुविधा विकसित करण्यात येत आहे. महापौर विक्रांत गोजमगुंडे, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, आयुक्त देविदास टेकाळे यांनी या केंद्रास भेट देऊन पाहणी केली.सर्व सुविधा अद्ययावत असल्याची खात्री करून घेतली. शहरातील नागरिकांना विविध सेवा पुरवताना दुर्दैवाने महापालिकेच्या काही कर्मचाऱ्यांनाही कोरोनाची बाधा झालेली आहे. या कर्मचाऱ्यांना भेटून त्यांची आणि तेथे उपचार घेणाऱ्या इतर रुग्णांचीही आस्थेवाईकपणे चौकशी यावेळी करण्यात आली.कोरोनाला प्रतिबंध करणे आणि बाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी महापालिका प्राधान्याने काम करत आहे. यासोबतच विलगीकरणाची व्यवस्था मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली आहे. गरज पडली तर आणखी विलगीकरण केंद्र वाढविण्याचे नियोजन पालिकेने केलेले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये परंतु स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी. विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे. महापालिका व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महापौर विक्रांत गोजमगुंडे व उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी यावेळी केले. तसेच शहरातील वाढती कोरोना बाधित रुग्णांची संख्या पाहता आधिकाधिक बेड उपलब्ध होणे आवश्यक असून त्यादृष्टीने महापालिका प्रयत्नशील आहे. सध्या महानगरपालिकेच्या वतीने विकसित ५९३ रुग्ण उपचार घेत असले तरी नव्याने ५०० बेड विकसित केले जाणार असल्याची माहिती महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी दिली.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com


# तब्बल २५ वर्ष गावाला सरपंच नसल्याने भिवंडीतील पहारे गावची दयनीय अवस्था

**भिवंडी/अभिजित हिरे**

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात पहारे गावात तब्बल गेल्या २५ वर्ष सरपंच नसल्याने गावची विकासकामे ठप्प झाल्याने दयनीय अवस्था झाली आहे. गावात एकही आदिवासी नसताना सुद्धा १९९५ मध्ये या पहारे गावाला आदिवासी सरपंच आरक्षण पडले. मात्र या गावात एकही आदिवासी नसल्याने सरपंचाची खुर्ची आजही रिकामी असल्याने या गावातील रस्त्यांची दुरावस्था झाली असून खड्डेमय रस्ते आहे.

रस्त्यावरून ये जा करताना जीव मुठीत धरावा लागतो, तर पिण्याच्या पाण्याची टाकी २५ वर्ष पडून आहे. त्यामुळे बोअरवेलचे विकत पाणी गावकऱ्यांना घ्यावे लागत असून १० वर्षापूर्वी जिल्हा परिषदेची शाळा पडलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे विध्यार्थ्यांच्या जीवाला धोका आजही कायम आहे. त्याच प्रमाणे विजेचे खांब वाकलेले आहे. वीजतारा तुटलेल्या आहेत. पथदिवे नाहीत, गटारे सुद्धा नाहीत अशा विविध समस्या असल्याने सरपंचाचे आरक्षण हटवावे अशी मागणी नागरिक करीत आहेत.





आमच्या पहारे गावाला सरपंच नसल्याने ग्रामसेवक काम पाहतात मात्र त्यांच्या कडे दोन गावांची कामे असल्याने ते १५ दिवसांनी किव्हा महिन्याने येतात त्यामुळे कामे होत नाही, गावचा विकास होत नाही गावची सर्वच कामे पूर्णपणे ठप्प असल्याने गावची प्रगती होत नाही त्यासाठी शासनाने आरक्षण हटवणे गरजेचे आहे.

**– भरत भोईर**
**(पोलीस पाटील, पहारे)**

आमच्या गावच्या रस्त्यावर सर्वत्र खड्डे पडल्याने जीव मुठीत घेऊन वाहने चालवावी लागतात, महत्वाची बाब म्हणजे २५ वर्षा पूर्वी पाण्याची टाकी बांधली मात्र आजपर्यंत या टाकीत पाणीच नसल्याने गावकऱ्यांना पिण्यासाठी बोअरवेलचे पाणी घ्यावे लागत आहे, आमच्या गावात आदिवासी नसताना आरक्षण लादून आमच्या वर गुन्हाच लादला आहे. त्यामुळे शासनाने आरक्षण हटवून आमच्या गावाला न्याय द्यावा ही कळकळीची विनंती.

**– पुंडलिक पाटील**
**(माजी सरपंच, पहारे)**

# कोरोनाच्या काळात उत्तम कार्य केल्याने पोलिसांची प्रतिमा उंचावली –पोलीस आयुक्त अंकुश शिंदे

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

कोरोनाच्या काळात सोलापूर शहर पोलीस दलातील सर्वच पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांनी अत्यंत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या चांगल्या कार्यामुळे सोलापूर शहर पोलीस दलाची प्रतिमा उंचावली आहे. भविष्यात देखील आपल्या सर्व पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांकडून अशाच कामांची अपेक्षा राहणार आहे, असे प्रतिपादन सोलापूर शहर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी केले आहे. सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या २८व्या वर्धापनदिनानिमित्त पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी, गुणवंत पोलीस पाल्यांचा सत्कार सोमवारी सायंकाळी आयुक्तालयात संपन्न झाला.

त्यावेळी पोलीस आयुक्त अंकुश शिंदे बोलत होते. यावेळी सोलापूर शहर पोलीस उपायुक्त (गुन्हे विभाग) बापू बांगर, पोलीस उपायुक्त वैशाली कडूकर हे व्यासपीठावर उपस्थित होते. या प्रसंगी पोलीस आयुक्तालयाच्या वतीने कोरोनाच्या काळात उत्कृष्ट कामगिरी बजावणारे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सोलापूर शहर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

तसेच सोलापूर शहरातील सातही पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावल्या बद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. सहाय्यक पोलीस आयुक्त कमलाकर ताकवले, अभय डोंगरे, दीपाली दरेकर, प्रीती टिपरे यांनाही सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन विशेष सत्कार करून गौरविण्यात आली आहे. यावेळी मुस्कान शेख विद्यार्थिनींने मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संदीप शिंदे यांनी केले तर आभार सहाय्यक पोलीस आयुक्त कमलाकर ताकवले यांनी मानले.




### कायदा व सुव्यवस्था सुधारण्याकडे आणखी लक्ष देणार

पोलिसांची विशिष्ट प्रकारची नोकरी असून हे मानसिक स्वभावाशी संबंधित खात आहे. आम्ही सोलापूरकरांची चांगली सेवा करीत आहोत. कायदा व सुव्यवस्था अजून कसे सुधारले जाईल याकडे आमचे लक्ष आहे. प्रत्येक जनतेनेही शांतता व सुव्यवस्था राखणे गरजेचे आहे. शहरात विविध बहुभाषिक संस्कृतीचे लोक आहेत. या विविध संस्कृतीच्या लोकांमध्ये मी आज काम करीत आहे. हे माझे भाग्य समजतो, असेही सोलापूर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी व्यक्त केले.

# धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी मनाई आदेशाचे नागरीकांनी काटेकोरपणे पालन करावे -जिल्हाधिकारी

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये मान्सून कालावधीत धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात व त्या ठिकाणी जिवीतहानी होण्याच्या घटना घडत असतात. तसेच सद्या कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव लक्षात घेता, धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी जाण्यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आला असुन मनाई आदेशाचे नागरीकांनी काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी केले. पावसाळयात पालघर जिल्ह्यामध्ये असलेले धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी या ठिकाणी मोठया प्रमाणात पर्यटक पर्यटनासाठी आल्याने गर्दी होण्याची व सामासिक अंतर राखले न जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या ठिकाणी पर्यटकांची सुरक्षा अबाधित रहावी व कोणत्याही प्रकारची जिवीतहानी होऊ नये म्हणून दि.१०/०८/२०२० रोजीच्या आदेशान्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३चे कलम १४४ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४(उ) अन्वये दि. ११/०८/२०२० ते दि.०८/१०/२०२० पर्यत पालघर जिल्हयामधील सर्व धबधबे, तलाव, धरणे, किल्ले व समुद्र किनारी जाण्यास मनाई आदेश लागू केलेला असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले या मनाई आदेशाचे सर्व नागरीकांनी काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ कैलास शिंदे यांनी केले आहे.

# देवणी येथील कोविड सेंटरमध्ये अपुऱ्या सोयी सुविधा; जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील कोरोना बाधित रुग्णासाठी देवणी नेकनाळ रस्त्यावरील समाजकल्याण विभागाच्या वतीने बांधण्यात आलेल्या शासकीय मुलांच्या वसतिगृहात कोविडच्या रुग्णांना उपचारासाठी कोविड सेंटर उघडण्यात आले असून त्या सेंटरमध्ये कसल्याच सेवासुविधा पुरविल्या जात नसल्याची तक्रार शिवाभाऊ कांबळे मित्रमंडळ व नागरिकांनी देवणीचे तहसीलदार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे. तसेच रुग्णाना एक वेळा नाष्टा व दोन वेळा जेवण दिले जाते, परंतु कोविड सेंटर मधील रुग्णाना राशनचे गहु, भातने बनवलेली शिवभोजन थाळी दिले जात असल्याचे बोलले जात आहे. शासन कोवीड रुग्णासाठी चांगल्या दर्जाचे जेवणाचे पैसे देते असे बोलले जाते, परंतु देवणी येथील रुग्णाना दहा रुपयाचे शिवभोजन देतात या प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी सुजान नागरीकांतुन होत आहे. तसेच सर्वच ग्रामीण भागातील रुग्णालयात व्हेंटिलेटर आहेत. परंतु देवणीत व्हेंटिलेटरची सुविधा उपलब्ध नाही म्हणून देवणीतील एका पस्तीस वर्षीय नगर पंचायत कर्मचारी अंकुश पतंगे यांचा बळी गेला आहे. त्यामुळे देवणीचे कोविड सेंटर असून अडचण नसून खोळंबा झाले आहे.




प्रशासनाच्या वतीने तहसीलदार यांनी शासनाकडून येणाऱ्या सोयीसुविधा पुरविल्या जात असल्याचा दावा करीत असले तरी कोविड सेंटरमध्ये असलेले बाधित रुग असमाधानी आहेत त्यांच्या व्यथा जाणून घेऊनच आम्ही निवेदन दिले आहे असे शिवाभाऊ कांबळे यांनी क्राईम संध्याशी बोलताना सांगितले. तहसीलदार यांनी कोविड सेंटरमधील बाधित लोकांना सेवा पुरवण्या संदर्भात सुधारणा करण्याऐवजी निवेदनकर्त्यानाच कायदा सुव्यवस्था शिकवित आहेत. या प्रकरणाकडे पालकमंत्री अमित देशमुख व विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांनी स्वतः देवणीच्या कोविड सेंटरकडे लक्ष देऊन कोरोना पिढीत लोकांना योग्य त्या सोई सुविधा पुरवाव्या अशी मागणी निवेदना व्दारे करण्यात आली आहे.. या निवेदनावर शिवाभाऊ कांबळे, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग कदम, बामसेफचे आखील सय्यद, विद्यासागर शिंदे आतीक सय्यद यांच्या साह्य आहेत.

# दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांना, आयएमए व पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आदरांजली

**लातूर/प्रतिनिधी**

केवळ लातूर जिल्हाच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्राचे भाग्यविधाते, दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या आठव्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून आयएमए व पोद्दार हॉस्पिटल परिवाराच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांना आपल्यातून जाऊन पाहता – पाहता आठ वर्षांचा कालावधी उलटला. तरीही एक क्षणही त्यांची आठवण आली नाही असा दिवस लातूरकरांसाठी उजाडला नाही, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. सर्वांच्या कायम हृदयसिंहासनावर विराजमान असणाऱ्या या दिवंगत लोकनेत्याच्या आठव्या स्मृतिदिनाचे स्मृतिदिनाचे औचित्य साधून लातूर आयएमए शाखा व पोद्दार हॉस्पिटल परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमासजिल्हाधिकारी जी. श्रीकांत, आयएमएचे अध्यक्ष डॉ. विश्र्वास कुलकर्णी, आयएमए महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. सुरेखा काळे, डॉ. दीपक गुगळे,पोद्दार हॉस्पिटलचे संचालक डॉ. अशोक पोद्दार, डॉ. चेतन सारडा, डॉ. कल्याण बरमदे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांसह सर्व मान्यवरांच्या हस्ते यांनी दीपप्रज्वलन करून लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.



यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना आयएमएचे अध्यक्ष डॉ. विश्र्वास कुलकर्णी म्हणाले की, वास्तविक पाहता तमाम लातूरकरांच्या दृष्टीने १४ ऑगस्ट हा दिवस अत्यंत वाईट असा आहे. कारण याच दिवशी लोकनेते विलासराव देशमुख आपल्यातून निघून गेले. आपल्या लाडक्या लोकनेत्याच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिवर्षी लातूरच्या सर्व डॉक्टरांच्या वतीने भव्य सर्व रोग निदान शिबीर आयोजित केले जाते. मात्र या वर्षी कोरोना महामारीच्या पार्श्र्वभूमीवर अशा प्रकारचे जाहीर कार्यक्रम घेणे शक्य झाले नाही. कोरोनाचे संकट दूर झाल्यानंतर पुढील वर्षी असेच भव्य कार्यक्रम निश्र्चितच आयोजित केले जाणार आहेत. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांनी लातूरकरांसाठी संरक्षक कवच उपलब्ध करून देण्याचे महान कार्य केले आहे. लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व तज्ज्ञ डॉक्टर्सनाही त्यांनी अशीच सुरक्षा दिली. चांगल्यात चांगल्या वैद्यकीय सुविधा लातूरमध्ये उपलब्ध व्हाव्यात म्हणूनही त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात आज जो अमुलाग्र बदल झालेला पाहावयास मिळतोय, तो विलासराव देशमुख त्यांच्यामुळेच आहे, असेही डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने मागच्या सलग सात वर्षांपासून मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षी कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शिबीर घेतले गेले नाही. स्मृतिदिनाच्या निमित्ताने पोद्दार हॉस्पिटलच्या प्रतिक्षा कक्षात विलासराव देशमुख यांच्या भाषणांची चार तासांची व्हिडिओ चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी पोद्दार हॉस्पिटलचे संचालक डॉ. अशोक पोद्दार यांनी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

# १०० ब्रास वाळुसाठा असेल, तर २० ब्रासची होतेय जप्ती देवणी महसुलचा विभागाचा अनोखा कारभार

**देवणी/शकिल मनियार**

शासनाच्या गौण खनिजावर डल्ला मारुन कमावलेल्या पैशामुळे हे वाळु तस्कर आता मांजराकाठावर अमिरी, श्रीमंती, पाटील, दाजी, पटेल, भाऊ, बिरादार, धनवान या नावाने समाजात प्रचलित होत आहे. बहुतांशी वाळु माफीया हे गावस्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थेचे आजी, माजी पदाधिकारी असल्याने सामान्यात यांची चलती आहे. सर्वसामान्य आमच्या पाठीमागे असल्याचा अभास सामाजिक कार्यक्रमात वावरत असताना दाखवतात. यावरुन प्रशासनावर दबाव अथवा छाप टाकण्याचा प्रयत्न नेहमीच करताना दिसतात. मांजरा नदीपात्रालगत प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनीत वाळुचे थर आहेत. उन्हाळ्यात पोकलेन मशिन लावुन टिप्परने उपसा करुन साठा करतात. प्रशासनाकडुन सदरील साठे जप्तीही दाखवतात. उदा.१०० ब्रास वाळु साठा असला तर २० ब्रास जप्ती दाखवतात व शासनाच्या नियमाप्रमाणे रॉयल्टी दंड भरणा करुन पावत्या करुन घेतात.याच पावत्यावर विशिष्ट शाईने लिखाण करुण आगपेटीच्या काडीने लिखाण खोडुन तीच पावती परत परत वापरली जाते.पण पावत्या किती होतेय याकडे दुर्लक्ष करण्यासाठी विशेष अर्थिक निधीही अधिकाऱ्यांना दिली जाते अशी चर्चा आहे. एंकदरीत हजारो ब्रास वाळु उपसा करुन केवळ शकडोवर जप्ती दाखवुन शासनाचा महसुल बुडवण्याचा ठेका वाळुमाफिया व प्रशासनाकडुन मिलीभगत करुन शासनाला चुना लावण्याचा ठेका घेतला आहे. प्रशासनाकडून लहान वाळु माफियावर कारवाई अधुनमधुन होते.पण शार्क माशाची शिकार प्रशासनाला करणे जिकरीचे ठरते. वृत्तपत्रात बातम्या प्रकाशित झाल्यास बातमी छापणाऱ्या पत्रकारालाच वाळुमाफियाकडुन दबावतंत्र वापरले जाते. शिवाय प्रशासनाकडुनही वेठीस धरले जाते. महसुल विभाग स्वच्छ असेल तर चालु आर्थिक वर्षात निलंगा उपविभागात एकुण रेती उपसा, जप्ती ब्रास वाळु, दंड आकारणी यांची माहिती प्रशासनाने सादर करावी अशी मागणी जाणकारातुन होत आहे.

# महाराष्ट्रातील १० पोलीस अधिकाऱ्यांना, केंद्रीय गृहमंत्रालयाचे विशेष पोलीस पदक

**मुंबई/प्रतिनिधी**

उत्कृष्ट तपास कार्य करणाऱ्या देशातील १२१ पोलीस अधिकारी–कर्मचाऱ्यांना आज केंद्रीय गृहमंत्रालयाचे विशेष पोलीस पदक जाहीर झाले असून यात महाराष्ट्रातील १० पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. उत्तम तपास कार्य करणाऱ्या पोलिसांच्या कार्याची दखल घेत केंद्रीय गृहमंत्रालयाने आज वर्ष २०२० साठीच्या विशेष पोलीस पदकांची घोषणा केली. पोलिसांमध्ये तपास कार्याबद्दल उच्च व्यावसायिक दृष्टीकोण निर्माण व्हावा व उत्तम तपास कार्याची दखल म्हणून २०१८ पासून सुरु झालेल्या या पुरस्कारासाठी यावर्षी महाराष्ट्रातील १० पोलीस अधिकाऱ्यांची निवड झाली आहे.

**महाराष्ट्रातील या अधिकाऱ्यांना विशेष पोलीस पदक**

शिवाजी पंडीतराव पवार, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा, पुणे शहर), राजेंद्र सिदराम बोकडे, पोलीस निरीक्षक, उत्तम दत्तात्रेय सोनवणे, पोलीस निरीक्षक, नरेंद्र कृष्णराव हिवरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ज्योती लक्ष्मण क्षिरसागर, पोलीस अधीक्षक, अनिल तुकाराम घेरडीकर, उप विभागीय पोलीस अधिकारी, नारायण देवदास शिरगावकर, उप पोलीस अधीक्षक (उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती), समीर नाजीर शेख, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा,नाशिक शहर), किसन भगवान गवळी, सहायक पोलीस आयुक्त, कोंडीराम रघु पोपेरे, पोलीस निरीक्षक विशेष पोलीस पदकासाठी देशातील १२१ पोलीस अधिकारी – कर्मचाऱ्यांची नावे जाहीर झाली असून यात केंद्रीय गुन्हे अन्वेषन विभागाचे १५, महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील प्रत्येकी १०, उत्तर प्रदेशातील ८, केरळ आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी ७ अधिकारी कर्मचाऱ्यांसह उर्वरित अन्य राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या पोलीस अधिकारी– कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. विशेष पोलीस पदक जाहीर झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये एकूण २१ महिलांचा समावेश आहे.

# मान्यवरांनी केले आदिवासींच्या रानभाज्या प्रदर्शनाचे कौतुक

**पालघर/प्रतिनिधी**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या सूचनेनुसार कृषी मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादासाहेब भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी दिनाचे औचित्य साधून आदिवासींना रोजगार निर्मिती व्हावी व राणभाज्यांचे महत्त्व व परिचय जनतेला व्हावा यासाठी राणभाज्यांचे आयोजित करण्यात आलेल्या रानभाज्यांच्या प्रदर्शनाचे आज मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले.कोसबाड हिल येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांनी रानभाज्या महोत्सवात ठेवल्या रानभाज्या प्रदर्शन व पाककृती स्पर्धाची पाहणी केली.

निसर्गात उगवलेल्या भाज्या म्हणजे रानभाज्या, शरीरात प्रतिकार शक्ती निर्माण करण्यासाठी रानभाज्या शरिराला आवश्यक आहेत. असे प्रतिपादन यावेळी खा.राजेंद्र गावित यांनी केले. तर आ.विनोद निकोले यांनी शरिर सदृढ ठेवण्यासाठी रानभाज्या आवश्यक आहेत. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रानभाज्या औषधी वनस्पती असून प्रत्येकाने राणभाज्यांचे सेवन केले पाहिजे असे उद्गार यावेळी आ. श्रीनिवास वनगा यांनी काढले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी आदिवासींच्या प्रदर्शनाची प्रशंसा करून अशा कार्यक्रमासाठी आदिवासींना जिल्हा प्रशासनातर्फे प्रोत्साहन दिले जाईल असे सांगितले. रानभाज्याचे ४० स्टॉल तर पाककृती स्पर्धाचे १७ स्टॉल सदर महोत्सवात ठेवण्यात आले होते. सदर महोत्सवात भाग घेतलेल्या सर्व स्पर्धकांमधून तीन क्रमांकापर्यंत बक्षिसे तर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. सदर कार्यक्रमात विकास पाटील, विभागीय कृषी सहसंचालक कोकण विभाग, के.बी.तरकसे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी पालघर,डॉ. विलास जाधव वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कषि विज्ञान केद्र कोसबाड ,सामजिक कार्यकर्ते जगन्नाथ हिलीम उपस्थित होते.



17 TO 23 AUGUST 2020 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 15/08/2020 7:38 PM Page 1



## कृषीदुत पोचले शेतकऱ्यांच्या बांधावर




**रावेर/प्रतिनिधी**

रावेर तालुक्यात लॉकडाऊनमध्ये सर्व शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालय बंद असल्यामुळे ऑनलाईन वर्ग घेतले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर महात्मा फुले कृषी विद्यापीठांतगत के.व्ही.पटेल कृषी महाविद्यालय, शहादा येथील अंतिम वर्षातील विद्यार्थ्याकडून प्रात्यक्षिकाचा भाग म्हणून ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. भुषण मधुकर निळे या विद्यार्थ्याने रसलपुर (ता. रावेर ) येथील शेतकरी हरिश्चंद्र निळे यांच्या शेतात जाऊन शेतकरी बांधवांना कृषीविषयक माहिती दिली. कापूस या पिकाची लागवड व येणाऱ्या रोगाविषयक माहिती दिली. यावेळी हरिश्चंद्र निळे, विकास हिवराळे, अनिल धनके, फिरोज तडवी, दिपक निळे आदी शेतकरीबांधव उपस्थित होते. यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एल. पटेल व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## २५ चोरीचे मोबाईल व एका मोटारसायकलसह ४ लाख २ हजार ८०० रुपयाचा मुद्देमाल जप्त!

**लातूर/करकरे अंबादास**



शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक दिवसांपासून मोबाईल चोरी व मोबाईल हिसकावून घेण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत होते. याबद्दल पोलीस ठाण्यात तक्रारीही सतत वाढत होत्या या अनुषंगाने शिवाजी नगरचे कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून परिचित असलेले पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे यांच्याकडे तपास सोपविण्यात आला होता. आणि त्या अनुषंगाने पुढील तपासाचे चक्र गतिमान केले असता एक्या गुप्त माहितीच्या आधारे शहरातील एका इसमाकडे चोरीचे मोबाईल असल्याची खात्री झाल्यावर त्या इसमाच्या मुसक्या आवळून अधिक तपास केला असता हा मोबाईल आरोपी नामे बाबासाहेब काशिनाथ वाघमारे राहणार जय भीम नगर लातूर व सुरज उर्फ भैय्या मधुकर मोरे राहणार म्हाडा कॉलनी लातूर यांना अटक करून गु.र.न.२१६/२०२० कलम ३९२,४११,३४ भा द वि मधील जबरी चोरी करुन मोबाईल चोरणाऱ्या चोरांना अटक करून चोरीस गेलेला ५९ हजाराचा एक मोबाईल व तसेच चोरीचे इतर २४ मोबाईल जप्त करण्यात आले.

सदर मोबाईल चोरण्यासाठी वापरण्यात आलेली मोटार सायकल हीसुद्धा चोरीची असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदरच्या तपासात जिल्हा पोलीस अधीक्षक राजेंद्र माने, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन सांगळे, पोनि. नानासाहेब लाकाळ, पोनि. उबाळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे यांच्यासह पोना. दत्ता शिंदे, पोकॉ. धैर्यशील मुळे व सायबर शाखेचे गणेश साठे यांनी तपास करून चार आरोपींना अटक केली व त्यांच्याकडून २५ मोबाईल व १ मोटारसायकल असा एकुण ४ लाख २ हजार ८००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## परिवहन महामंडळाच्या बस माल वाहतुकीसाठी सज्ज

**वाडा/प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने प्रवासी वाहतूकीसह समान वाहतूक करण्यासाठी बसचे ट्रक मध्ये रूपांतर कण्यात आले असून या ट्रक व्यापारी व शेतकऱ्यांच्या सेवेसाठी राज्यभर सज्ज झाल्या आहेत. प्रवाश्यांच्या वाहतुकी सोबतच मालवाहतूक सेवे मधील अन्नधान्य, भाजीपाला इत्यादीची वाहतूक करण्यासाठी पालघर येथील परिवहन महामंडळाच्या वर्क शॉप मधून १० ट्रक अन्नधान्य वाहतूकी साठी देण्यात आल्या आहेत तर अजून दहा ट्रक ची निर्मिती होत असून काही दिवसात त्या सुद्धा सेवेत रुजू होणार आहेत या नवीन उपक्रमामुळे एसटीच्या उत्पन्नात वाढ होणार असून कोरोनाच्या काळात बंद असलेली बस सेवेमुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी हातभार लागेलं. सद्या १० बसचे ट्रक मध्ये रूपांतर करून त्या अन्नधान्य वाहतुकी साठी देण्यात आल्या आहेत तसेच दुसऱ्या १० ट्रक तयार करण्याचे काम प्रगती पथावर असून काही दिवसात दुसरी १० ट्रकची बॅच तयार होईल अशी माहिती पालघर परिवहन महामंडळ वर्कशॉपचे सहाय्यक यंत्र अभियंता संदीप शिंदे यांनी दिली.

## वाडा बस स्थानका समोरील मोबाईल दुकानात चोरी




वाडा : वाडा बस स्थानका समोरील मोबाईलच्या दुकानाचा पत्रा वाकवून रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने चोरी केल्याचा प्रकार सोमवारी सकाळी उघडकीस आला आहे. बस स्थानका समोर असलेल्या श्री समर्थ कृपा मोबाईल या दुकानाच्या छताचा पत्रा पाठीमागून वाकवून आत प्रवेश करून चोरी केल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले. दुकानात असलेले तीन मोबाईल व काही रोख रक्कम चोरीला गेली असल्याची माहिती दुकानदार राकेश भानुशाली यांनी दिली. लॉकडाउन काळात नगर पंचायतीने नगर पंचायत हद्दीतील दुकाने संध्याकाळी सात वाजल्या नंतर बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत त्यामुळे दुकाने लवकर बंद होऊन रस्त्यावर शांतता पसरलेली असते याच वेळेचा फायदा घेत चोरट्याने चोरी केली असल्याचे बोलले जात आहे.

## महाराष्ट्र शासन व टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ई-पिक पहाणी ॲप विकसित

**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन व टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची नोंद करण्यासाठी ई-पिक पहानी अँप विकसित केले आहे. याद्वारे अँव द्वारे शेतकरी हंगामनिहाय त्यांच्या मालकीच्या शेतातील पिकांच्या नोंदी हे अँप वापरून नोंदवू शकतात. यासाठी आपण आपल्या मोबाईल क्रमांक हा आपले ७/१२ खाते (एकूण जमीन दाखला) शी जोडायचा आहे. हे अँप डाउनलोड करण्यासाठी खालील लिंक वापरण्याचे आवाहन वाड्याचे तहसीलदार डॉ.उद्धव कदम यांनी केले आहे. https://play.google.com/ store/apps/ details?id=in.synergyconnect.tes किंव्हा आपण गूगल प्लेस्टोर मधून E peek pahani (english) किंवा ई-पीक पहाणी असे टाईप करून install करु शकता असेही त्यांनी सांगितले आहे. प्रत्येक शेतकऱ्यांनी e-peek पाहणी अँपद्वारे खरीप हंगाम २०२० चा पीक पेरा update करता येणार आहे. पिकांचे फोटो काढतेवेळी कोणते पीक आहे ते स्पष्ट दिसतील असाच फोटो काढावा, तरी गावातील सर्व शेतकरी बांधवांना, पदाधिकारी, समाजसेवक, विद्यार्थी व जे युवकवर्ग स्मार्ट फोन वापरतात त्यांना याद्वारे आवाहन करण्यात येते की सर्वांनी हे अँप (app) वापरून खरीप हंगामातील पीक नोंदी नोंदवाव्यात कृषी पतपुरवठा, पीक विमा, शासकीय योजना, पीक विमा दावा करण्यासाठी विश्वासार्ह पुरावा, नैसर्गिक आपत्तीच्या नुकसान भरपाई साठी आवश्यक. असल्याने ई-पीक नोंदणी करावी, यासाठी आपणास आपल्या मोबाईल चा इंटरनेट डेटा (Internet) व जीपीएस (gps Location) सुरू ठेवणे गरजेचे असल्याचेही कदम यांनी स्पष्ट केले आहे.

पान १ वरून...

### सवर्णांच्या मुजोरीमुळे दलितांचे ...

कारवाई करणे आवश्यक आहे. पण तसे घडत नसल्याने पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्राला शरमेने मान खाली घालायला लागेल अशी संतापजनक घटना जळकोट तालुक्यातील येवरी गावात घडली आहे. एका मातंग समाजाच्या व्यक्तीने सवर्णाच्या शेताच्या शेजारी शेळ्या चरायला नेल्या. या शुल्लक कारणावरून सवर्णानी जातीवाचक शिवीगाळ करून त्यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या त्या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे एवढे सगळं होऊन एफआयआर दाखल झाला. आरोपींची नावे समजली, तरीही अजून पोलिसांनी आरोपींना अटक केलेली नाही. त्यामुळे केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यात संतापाची लाट पसरली आहे. या संपूर्ण प्रकरणात पोलिसांची भूमिका पूर्णपणे संशयास्पद असून आरोपींनी पोलिसांना मॅनेज केल्याचा आरोप केला जात आहे.

जळकोट तालुक्यातील येवरी गावात राहणारे बालाजी कांबळे हे आपल्या शेळ्या चरण्यासाठी कालव्या लागत असलेल्या लाळी खु शिवारात गेले होते. त्यांच्या सोबत त्यांचे भाऊ केशव कांबळे हे सुद्धा होते. याच दरम्यान बालाजी कांबळे यांची एक शेळी काशिनाथ मादलापुरे यांच्या सोयाबीनच्या शेतात गेली. मात्र बालाजीने ताबडतोब त्या शेळीला परत आणले. पण या शुल्लक कारणावरून विवेकानंद मादलापुरे, गजानन मादलापुरे आणि चंद्रकला मादलापुरे यांनी बालाजी कांबळे व केशव कांबळे यांना जातीवाचक शिवीगाळ करीत लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. तर केशव कांबळे यांना चंद्रकला आणि काशिनाथ यांनी चपलाने व काठीने मारहाण करून त्यांच्या सर्व शेळ्या ताब्यात घेऊन कोंडून ठेवल्या. दरम्यान मादलापुरे यांच्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या बालाजी कांबळे यांना सुरवातीला वाढवणं येथील शिब्रा क्लिनिकमध्ये नेवून प्राथमिक उपचार केले. त्यानंतर आणि नंतर ७/८/२०२० रोजी उदगीरच्या माऊली रुग्णालयात नेले. मात्र कोरोनामुळे बेड उपलब्ध नसल्याने त्यांना केवळ तपासून एक्स-रे काढून औषधे लिहून देऊन घरीच उपचार करायला सांगितले. पण दोन दिवसांनी बालाजी कांबळे यांना पाठीवर आणि मांडीवर रॉडने केलेल्या मारहाणीच्या जखमा चीघळल्या त्यामुळे त्यांना प्रचंड वेदना होऊ लागल्या. त्यामुळे त्यांना पुन्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासल्यावर त्यांची गंभीर हालत बघून पोलिसांना कळवावे लागेल असे सांगितले. पण कांबळे कुटुंबीय गरीब असल्याने आणि गावात मादलापुरेंची दहशत असल्याने त्यांनी पोलिसांकडे जाण्यास नकार दिला. दरम्यान घरी आल्यावर बालाजी हा रात्रभर वेदनेने तडफडत होता त्यामुळे दुसऱ्या दिवशी त्याला पुन्हा रिक्षात टाकून दवाखान्यात नेले जात असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर मात्र हे प्रकरण पोलिसांकडे गेले. या प्रकरणी जळकोट पोलीस ठाण्यात गु.र.क्रमांक ०१३१/२० कलम ३०२, २९४, ३२३, ३२५, ५०४, ५०६ तसेच अनुसूचित जमाती अत्याचार अधिनियम ५(अ) नुसार आरोपींच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र आरोपींची नावे पोलिसांना ठाऊक असून आणि ते परिसरातच मोकाट फिरत असूनही पोलिसांनी अजून त्यांना अटक केलेली नाही.

दरम्यान या प्रकरणी गुन्हा दाखल झालेले आरोपी गजानन मादलापुरे, विवेकानंद मादलापुरे, काशिनाथ मादलापुरे आणि चंद्रकला मादलापुरे यांना तत्काळ अटक झाली नाही तर तीव्र आंदोलन करू असा इशारा काही दलित संघटनांनी दिला आहे. या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी शेलार मॅडम यांच्याशी भ्रमणध्वनी वरून संपर्क साधला असता आम्ही दोन दिवसात सर्व आरोपींना अटक करू असे आश्वासन त्यांनी क्राईम संध्या प्रतिनिधीशी बोलताना दिले आहे. मात्र या संपूर्ण प्रकरणात पोलिसांनी आरोपींबरोबर आर्थिक साटेलोटे करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न सुरु केल्याचा आरोप स्थानिक पातळीवर केला जात आहे. त्यामुळे स्थानिक पोलिसांचीही चौकशी केली जावी अशी मागणी करण्यात येत आहे.

### आईच्या पाठिंब्यामुळे लेकीचा धीर वाढला...

चूकीचा संदेश जात असल्यामुळे या घटनांमध्ये वाढ झाल्याचे नवी मुंबई परिमंडळ १ चे सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक वस्त यांनी सांगितले. नवी मुंबईतील नेरूळ परिसरातील रामलिला मैदानात गंभीर जखमी अवस्थेत एक तरूण पडला असल्याची माहिती नेरूळ पोलीस ठाण्याच्या तत्कालीन वरीष्ठ पोलीस निरीक्षक संगीता अल्फान्सो यांना मिळाली. संगीता अल्फान्सो यांनी आपल्या निवडक अधिकार्यासह घटनास्थळ गाठले. तेंव्हा तेथे साधारण २८ वर्षाचा एक तरूण रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याच्या डोक्यात खोलवर जखम होती. त्यातून बऱ्याच प्रमाणात रक्तस्राव झाला होता. पोलीसांनी अधिक वेळ न दवडता त्या जखमी तरूणाला तात्काळ डॉ. डि. वाय. पाटील रूग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. डोक्यात दगड घालून याची हत्या करण्यात आल्याचा निर्वाळा त्यावेळी डॉक्टरांनी पोलीसांना दिला. यावरून पोलीसांनी खूनाचा गुन्हा नोद करीत तो मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा सुरू केला. मयताच्या खिशात ओएनजीसी कंपनीचे ओळखपत्र सापडले. त्या ओळखपत्रानुसार त्याचे नाव स्वप्निल नामदेव पाटील (२९) असे आढळून आले. त्याचप्रमाणे तो रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात राहणारा होता. त्याच्या खिशात काहि मोबाईल नंबर सापडले. या मोबाईल नंबरवर पोलीसांनी संपर्क साधून मृत पाटील याच्या नातेवाईकांना पोलीसांनी रूग्णालयात बोलवून घेतले.नातेवाईकांकडून मृतदेहाची ओळख पटल्यानंतर पोलीसांनी चौकशीला सुरुवात केली. मयत स्वप्निलची पत्नीने तर मृतदेह पाहताच हंबरडा फोडला. तिला नातेवाईकांनी शांत केले.

पतीच्या मृत्यूचे खरे दु:ख तिलाच झाल्याचे दिसत होते. ती ओक्साबोक्सी रडत होती. तिचे रडणे काही केल्याने थांबत नव्हते. मृतदेहाचे अंतिम संस्कार पूर्ण झाल्यानंतर पोलीसांनी स्वप्निलची पत्नी संगिता पाटील हिला चौकशी सुरू केली. स्वप्निलचे कुणी दुश्मन होते का? नातेवाईकांपैकी कुणी त्याचा काटा काढला असेल का? त्याच्या जीवाला कुणा व्यक्ती पासून धोका होता का. असे अनेक प्रश्न पोलिसांनी तिला विचारले परंतु त्याचा कुणाबरोबर वादविवाद नव्हता. तो सर्वाबरोबर मिळून मिसळून राहत होता. आमचे एकमेकांवर खूप प्रेम होते. पण त्याची हत्या कुणी केली असेल हे तिला सांगता आले नाही. पोलीसांनी संगिताला घरी जाऊ दिले. तिने दिलेली प्राथमिक माहिती खूनाचा गुन्हा उघडकीस येण्यास पुरेसी नव्हती. परंतु संगिताच्या चौकशीत ती काहीतरी लपवत असल्याचे पोलीसांना समजले होते. कदाचित अनैतिक संबंधातून स्वप्निलचा काटा काढण्यात आला असावा असा संशय पोलीसांना होता.पण ठोस पुरावा नसल्यामुळे तपास पथक संगिताच्या हालचालींवर बारीक नजर ठेऊन होते. तिचे कॉल रेकॉर्ड तपासले असता ऐका मोबाईल नंबरवर तीचे सर्वाधिक बोलणे झाले असल्याचे स्पष्ट झाले होते.हा व्यक्ती कोण.? असा प्रश्न पोलिसांना पडला होता. पोलीसांनी पुन्हा संगिताला चौकशीला बोलवले. चौकशीत त्यांनी त्या मोबाईल नंबरबाबत विचारले असता तीचा चेहरा प्रचंड दडपणाखाली आला होता. तिच्या तोंडातून शब्द फुटत नव्हते. ती घाबरलेली दिसत होती. कसेतरी उसने अवसान घेऊन तिने तोंड उघडले. हा सलमान असून स्वप्निलचा मित्र आहे. तो माझ्या संपर्कात आहे. यावरून पोलीस काय समजायचे ते समजले. तपास पथकाने सलमानचा मार्ग काढत पोलीसांनी कराड, मलकापूर येथील बैल बाजार गाठले. पोलीस आल्याची चाहूल लागली तर हा लागलीच परागंदा होईल म्हणून पोलीसांनी साध्या कपड्यात सलमानच्या मुसक्या आवळल्या. इलाही उर्फ सलमान मीरशहा शेख (२१) यास ताब्यात घेऊन पोलीसांनी नेरूळ पोलीस ठाणे गाठले. पोलीस ठाण्यात त्याची पोलिसी खाक्या दाखवत पोलीसांनी कसून चौकशी केली असता, त्याने धक्कादायक माहिती देत आपणच दोन मित्रांच्या मदतीने संगिता व तिच्या आईच्या सांगण्यावरून स्वप्निलचा खून केल्याची कबुली दिली. संगिता व माझे अनैतिक संबंध असून यातूनच हे हत्याकांड घडले असेही त्याने पोलीसांना सांगितले.

पोलीसांनी संगिता पाटील व तिची आई शेवंता मारूती गायकवाड, सलमानचे साथीदार मल्हारी उर्फ मल्या हनुमंत गुजल, आणि शाहिद सुतार अशा पाच संशयित आरोपींना यांना ताब्यात घेतले. आता स्वप्निलची हत्या कशी करण्यात आली.? त्याच्या हत्येच्या कटात हे आरोपी कसे सामिल झाले.? कराड, मलकापूरचा सलमानचा आणि नवी मुंबईतील नेरूळ भागात राहणारी संगिताचा संबध कसा आला.? या सर्व प्रश्नांचा उलघडा करण्यास पोलीसांनी सुरुवात केली. नेरूळच्या नावा गावात राहणार्या स्वप्निलचे सात वर्षापूर्वी संगिताबरोबर विवाह झाला होता. स्वप्निल ओएनजीसी कंपनीत कामाला असल्यामुळे घरात कशाचीच कमतरता नव्हती.त्यांच्या संसारातील आनंदाला बहर आला तो अक्षरा (५) आणि जीवीन (२) या दोन मुलांमुळे.या दोन मुलांच्या आगमनाने स्वप्निल आणि संगिताच्या संसाराला चार चांद लागले होते. सर्वकाही सुरळीत सुरु होते. ऐके दिवशी स्वप्निल संगिताला घेऊन कराड,मलकापूर येथील बैलबाजार येथे काही कामानिमित्त गेला होता. तेथे समलमानची आणि स्वप्निलची ओळख झाली. त्याच्या ओळखीचे रूपांतरण घनिष्ठ मैत्रित झाले.यानंतर स्वप्निल, संगिता आणि सलमान हे तिघेही एकमेकांच्या संपर्कात राहीले. कालांतराने स्वप्निलचा संपर्क कमी झाला आणि संगिताचा संपर्क सलमान बरोबर वाढतच गेला. इथेच त्यांच्या संसारात धोक्याची घंटा वाजली होती. संगिता आता पूर्णपणे सलमानच्या आहारी गेली होती. यानंतरच त्यांच्यात अनैतिक संबंध प्रस्थापित झाले. हि बाब जेंव्हा स्वप्निलला समजली तेंव्हा फार उशीर झाला होता. संगिता स्वप्निलच्या ऐकण्याच्या बाहेर होती. ती स्वप्निलचे काहिच ऐकत नव्हती. जणू तिने सलमानलाच आपले सर्वस्व मानले होते. यामुळे स्वप्निल दारू पिऊन संगिताला मारहाण करू लागला होता. तरीही संगिता सलमानला सोडायला तयार नव्हती. हि बाब जेंव्हा संगिताच्या आईला कळाली तेंव्हा तिनेही संगिता व सलमानला साथ दिली. माझ्या मुलीला स्वप्निल पासून कायमचे सोडव अशी गळ तिने सलमानला घातली. यानंतर सलमान, शेवंता आणि संगिता या तिघांनी मिळून स्वप्निलच्या हत्येचा कट रचला.

यासाठी सलमान याने आपल्या दोन सहकार्यांना पैशाचे आमिष दाखवत आपल्या कटात सामील करून घेतले. घटनेच्या दिवशी सलमानने स्वप्निलला भेटायला बोलवले. त्या दिवशी त्यांनी स्वप्निलला खूप दारू पाजली. तेथून रात्रीच्या अंधारात स्वप्निलला रामलिला मैदानात आणण्यात आले. तेथे स्वप्निल दारूच्या नशेत बेशुद्ध अवस्थेत पडला असताना त्याच्या डोक्यात भलामोठा दगड घालण्यात आला.रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. स्वप्निलला आई असा उच्चार करायलाही वेळ मिळाला नाही. तो रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. आता तो मेला असेल याची खात्री पटल्यानंतर सलमान व त्याचे साथीदार तेथून निसटले. अंधारात केलेले पाप उघडकीस येणार नाही. स्वप्निलची हत्या करताना आपल्याला कुणी पाहिले नाही. असे मारेकर्यांना वाटले होते. परंतु नियतीचा सीसीटीव्ही चौवीस तास सुरू असतो हे कुठे त्यांना माहीत होते. अखेर या गुन्ह्यात नेरूळ पोलीसांनी शेवंता गायकवाड, संगिता पाटील सलमान आणि त्याचे दोन साथीदार अशा पाच ओरोपींना अटक केली. या आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी नेरूळ पोलीस भक्कम पुराव्याची जुळवाजुळव करीत असल्याचे तत्कालीन वरीष्ठपोलीस निरीक्षक संगीता अल्फान्सो यांना सांगितले.हा तपासात पोलीस निरीक्षक नागराज मजगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक जोगवेद्रसिंग राजपूत, पोलीस उपनिरीक्षक नितिन शिंदे आणि तपास पथकाने पूर्ण केला.

पान ८ वरून...

### पालघर जिल्हा राज्यात प्रगतिशिल जिल्हा...

यश आले आहे. शासनाने नुकतीच आदिवासी बहुल भागातील नागरिकांसाठी लॉकडाऊनच्या परिस्थितीत विशेष मदत मिळण्यासाठी खावटी योजना मंजुर केली असून त्याचा जिल्ह्यामधील नागरिकांना फायदा होईल असा विश्वास यावेळी पालकमंत्र्यांनी व्यक्त केला. यावेळी पोलीस प्रशासनात प्रशंसनीय कामगीरी केलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच कोरोनामध्ये शहिद झालेल्या पोलिस पत्नीला पालकमंत्र्याच्या हस्ते मुख्यमंत्री सहायता निधी मधून धनादेश सूपूर्द केला. सदर प्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन येथे डहाणू येथिल चठक्कण या लॅबचे तसेच रिव्हेरा येथे ५० आय.सी.यु. बेड व ४० व्हेंटिलेटर असलेले डी.सी.एच सेंटरचे इ-उद्धाटन पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाशल्य चिकित्सक आणि डॉ. दयानंद सुर्यवंशी यांच्या संकल्पनेतुन तयार झालेले होम आयसोलेशन या पुस्तकाचे अनावरण यावेळी करण्यात आले. यावेळी जि.प.अध्यक्ष भारती कामडी, खा.राजेंद्र गावीत, आ.श्रीनिवास वनगा, आ.विनोद निकोले, जि.प.उपाध्यक्ष निलेश सांबरे, नगराध्यक्षा उज्वला काळे, जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे, पोलीस अधिक्षक दत्ता शिंदे, उपजिल्हाधिकारी डॉ.किरण महाजन, अति.मु.का.चंद्रकांत वाघमारे, प्रकल्प संचालक माणिक दिवे, तसेच विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### हार्टच्या पेशंटला मदत करण्यास ...

रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांना महिन्यातून किमान दोनदा तरी चेकअपसाठी केईएममध्ये जावे लागते. पण गेल्या साडेचार महिन्यांपासून लॉकडाऊन असल्याने तसेच लोकल ट्रेन बंद असल्याने त्यांना उपचार मिळू शकले नाहीत आणि विरार मधील खाजगी रुग्णालयात उपचार करून घेण्याइतपत त्यांची आर्थिक स्थिती चांगली नाही. त्यात लॉकडाऊनमुळे चार महिने पगार नाही. त्यामुळे त्यांची अवस्था खूप वाईट झाली आहे आणि ही केवळ एकट्या सोनू जाधव यांचीच स्थिती नाही, तर त्यांच्या सारखेच हार्टचे, किडनीचे, कॅन्सरचे, ब्रेनचे असे कितीतरी रुग्ण आहेत ज्यांची मुंबईच्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पण लोकल ट्रेनच्या प्रवासाची त्यांना सवलत नसल्याने ते मुंबईला जावू शकत नाहीत. त्यामुळे काही रुग्णांचा घरातच तडफडून मृत्यू झाला. सोनू जाधव यांचेही तेच होण्याची शक्यता आहे. म्हणूनच त्यांनी अरविंद सावंत यांना फोन आणि मॅसेज करून ही गंभीर समस्या त्यांच्या कानावर घातली. पण सावंत यांनी काहीच ऐकूण घेतले नाही, उलट तुम्ही विरारमध्ये राहता त्या हितेंद्र ठाकूरला सांगा असा उर्मट सल्ला दिला. सोनू जाधव यांनी अरविंद सावंत यांच्याकडे पैशाची मदत मागितली नव्हती तर त्यांना आणि त्यांच्या सारख्या गंभीर आजाराच्या रुग्णांना लोकल ट्रेनने प्रवास करण्याची सवलत मिळावी यासाठी आपण खासदार या नात्याने काहीतरी प्रयत्न करा अशी विनंती केली होती. पण अरविंद सावंत यांनी काही ऐकून घेतलेच नाही, त्यामुळे संकट काळात सुद्धा आजारी माणसांबाबत हे लोक कसे वागतात हे दिसून आले. त्याच बरोबर बाळासाहेबांच्या वेळचे शिवसेना लोकप्रतिनिधी आणि आताचे लोक प्रतिनिधी यांच्यात किती जमीन आसमानचे अंतर आहे ते दिसून आले.

### विलासराव देशमुख यांच्या ...

उप अधिष्ठाता जनसंपर्क, वैद्यकीय अधीक्षक डॉ संतोषकुमार डोपे, कोरोना नोडल ऑफिसर डॉ. मारुती कराळे, डॉ. उमेश कानडे, सुरेश चौरे रक्तपेढी प्रमुख डॉ. के. टी. दळवे, डाँ. अजय ओव्हाळ, डॉ. अनिल मुंडे, डॉ. आशिष चेपुरे, मनोविकारशास्त्र प्रमुख डॉ. पवार, डॉ. दीप्ती सोनवणे, प्रशासकीय अधिकारी मगर यांची उपस्थिती होती . कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुरेंद्र सूर्यवंशी समाजसेवा अधीक्षक मीरा पाटील गिरीश मुसांडे. तिडके स्वामी यांनी परिश्रम घेतले.

### पत्रकारांना संरक्षण, शहरात ...

कोराणा महामारित जिव धोक्यात टाकूण करणाऱ्या पत्रकारांना पोलीस प्रशासनाने मागील बातम्यांचा मनात राग धरुन लातुर,अहमदपूर, उदगीर, निलंगा, औराद शहाजानी या ठिकाणी पत्रकारांना मारहाण केली त्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर पत्रकारांना मारहान केल्यावरुन कार्यवाही करण्यात यावी असे निवेदन उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलिस अधिकारी सौ.अश्विनी (पाटील) शेलार यांना देण्यात आले आहे.

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी घेतला १० राज्यातील कोरोना उपाययोजनांचा आढावा

# मुंबईसह सर्व जिल्ह्यांमध्ये साथरोग नियंत्रण रुग्णालये सुरु करणार -उद्धव ठाकरे

**मुंबई/प्रतिनिधी**

देशाच्या एकूण कोरोना रुग्णसंख्येपैकी ८० टक्के रुग्ण हे १० राज्यांमध्ये आहेत. या दहा राज्यांच्या प्रयत्नातून कोरोनाला हरविलं तर देश जिंकेल असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत व्यक्त केला. दरम्यान, महाराष्ट्रात मुंबईसह सर्व जिल्ह्यांमध्ये साथरोग नियंत्रण रुग्णालये सुरू करणार असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. कोरोनामुक्त झालेल्या काही रुग्णांना बरे झाल्यानंतरही अन्य आजार झाल्याचे निदर्शनास आले असून कोरोनानंतरच्या उपचाराची व्यवस्था निर्माण होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी केले. आज प्रधानमंत्री मोदी यांनी महाराष्ट्र, गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू, बिहार आणि उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांशी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधत कोरोना उपाययोजनांचा आढावा घेतला. यावेळी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, अर्थमंत्री निर्मला सितारामन, आरोग्यमंत्री डॉ. हर्षवर्धन यांच्यासह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आरोग्यमंत्री राजेश टोपे, मुख्य सचिव संजय कुमार विविध राज्यांचे मुख्य सचिव आदि उपस्थित होते.

**मृत्यूदर १ टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दीष्ट - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी**

दहा राज्यांमध्ये क्टीव्ह केसेसचे प्रमाण ८० टक्के आहे. त्यामुळे कोरोना विरुद्धच्या लढ्यात या राज्यांची भूमिका महत्वाची असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितले. याराज्यांकडून कोरोना विरुद्ध करण्यात येत असलेल्या उपाययोजनामुळे आणि अनुभवातून कोरोनावर एकत्रितपणे मात करणे शक्य होईल. ही दहा १० राज्ये जिंकली तर देश जिंकेल असे सांगतानाच कोरोनामुळे होणारा मृत्यूदर १ टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दीष्ट असल्याचे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. एखाद्या व्यक्तीला कोरोनाचा संसर्ग झाल्याच्या ७२ तासांत त्या व्यक्तीच्या निकटसहवासातील व्यक्तींचे सर्वेक्षण चाचण्या केल्या तर संसर्गाचे प्रमाण कमी होईल. त्यामुळे सुरूवातीचे ७२ तास महत्वाचे हे लक्षात घेऊनच ट्रेसींग, टेस्टींग वाढवावे असे आवाहन प्रधानमंत्र्यांनी केले. यावेळी महाराष्ट्राने केलेली कामगिरी मांडताना मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले की, कोरोना बाधित आणि मृत्यू झालेली एकही केस लपवली नाही. पारदर्शीपणे माहिती दिली. कोरोनाबाबत अनेकांच्या मनात भिती तर अनेकांमध्ये काही ही होत नसल्याची लापरवाई आहे तर पोटासाठी बाहेर पडण्याची मजबूरी देखील आहे अशा तीन अवस्थेत कोरोनाचा सामना सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

**कोरोनाची दुसरी लाट महाराष्ट्रात येऊ देणार नाही - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे**

राज्यातील मृत्यू दर कमी करण्याचा प्रयत्न केला जात असून मुंबईतील धारावी, वरळी येथील स्थिती नियंत्रणात आणल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र अजुनही लढाई संपली नाही.कोरोनाची दुसरी लाट महाराष्ट्रात येऊ देणार नाही यासाठी प्रयत्नशील असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. याकाळात शिवभोजन योजनेच्या माध्यमातून महिन्याला लाखो लोकांना केवळ ५ रुपयांमध्ये जेवणाची सोय केली. राज्यातील गरीब जनतेला याचा मोठा लाभ झाला आहे. मागच्या आठवड्यात कुपोषण निर्मुलनासाठी आदिवासी बालकांना व मातांना दुध भूकटी मोफत देण्याचा निर्णय देखील राज्यशासनाने घेतल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. कोरोनातून बरे होऊन घरी जाणाऱ्या लोकांना इतर आजार झाल्याचे दिसून येत आहे. त्यांच्यावर कोरोनानंतरही उपचार व्हावे यासाठी यंत्रणा निर्माण करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात साथ रोग नियंत्रण रुग्णालय मुंबईसह सर्व जिल्ह्यांमध्ये सुरु करणार असल्याचे ते म्हणाले. इमिनॉलॉजी लॅबची संख्या वाढविण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितले. विविध प्रकारच्या विषांणुचा उद्भव कसा आणि का होतो यावर संशोधन करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. जे उद्या करायचे ते आज आणि आज करायचे ते आत्ता असे उद्याचे जग कोरोनाने आजच दाखवले.




**अंतिम वर्षाच्या परिक्षांबाबत देशपातळीवर एकच निर्णय घ्यावा**

विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून त्यांचे जीवन धोक्यात घालता कामा नये त्यामुळे नॉन प्रोफेशनल कोर्सेसच्या अंतिम वर्षाच्या परिक्षा घेऊ नयेत अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी पुन्हा एकदा प्रधानमंत्र्यांकडे केली. विद्यार्थ्यांना सरासरी मार्क्स देऊन (ग्रीगेट) उत्तीर्ण करण्यात यावे. कोरानामुळे किती काळ असे राहणार याचे उत्तर नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य किती काळ टांगून ठेवणार, यासाठी देशपातळीवर एकच निर्णय लवकरात लवकर घेण्याची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. वैद्यकीय शिक्षणाच्या अंतिम वर्षाच्या परिक्षाबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता असून विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार, मौखिक स्वरूपात परीक्षा घेण्याची गरज. अंतिम वर्षाचे विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर कोरोना युद्धात त्यांच्या इच्छेनुसार मदत घेता येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्यात कोरोना उपचारासाठी ऑक्सीजन, व्हेंटिलेटर आणि इतर सुविधांसह सज्ज अशा साडेतीन लाख खाटा उपलब्ध असल्याचे सांगतानाच यासुविधांसाठी डॉक्टर, नर्से, कर्मचारी यांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

**मास्क, सोशल डिस्टंसिंग सध्या हे औषध**

कोरोनावर अद्याप औषध नाही आणि लस अजून उपलब्ध झालेली नाही. जनजागृती करतांना आज घडीला तरी मास्क, सोशल डिस्टंसिंग हेच औषध आणि लस आहे असे नागरिकांना समजून सांगतले आणि अशा पद्धतीने कोरोनासोबत आपण जगायला शिकलो तर लॉकडाऊन नाही तर अनलॉकिंगची प्रक्रिया आणखी सोपी आणि जलद होईल, असे मत मुख्यमंत्र्यांनी यावेळी मांडले.

## हिसामनगर मोड ते हिसामनगर रस्ता लवकरात लवकर पुर्ण करण्याचे तहसीलदारांना निवेदन!



**देवणी/शकिल मनियार**

देवणी तालुक्यातील मौजे हिसामनगर (माटेगडी) ते हिसामनगर मोड येथील रस्त्यांचे नूतनीकरण करण्याचे काम मागच्या दोन वर्षापासुन सुरू करण्यात आले ते आजतागायत पुर्ण झाले नाही. या रस्त्यावरून मांजरा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणांत माती काढण्याचे काम झाले येथुन माती काढल्यामुळे जिल्ह्यातील अनेक गावांतील जमिनी सुपीक बनल्या, पण या गावांतील नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागला. त्यावेळी ग्रामस्थांनी मातीचे टिप्पर बंद ठेवले. तेव्हा या रस्त्यांचे काम लवकरात लवकर करून देण्याचे आश्वासन प्रशासनातर्फे ग्रामस्थांना देण्यात आले होते. पण आज तगायत काम पुर्ण झाले नाही. त्यामुळे त्यावेळेस पासुन गावात येणाऱ्या महामंडळ बस फेऱ्या सुद्धा बंद झाल्या. अनेक अपघात झाले, यात अनेक जण जखमी झाले. पण रस्त्यांचे काम पूर्ण झाले नाही. अधून मधुन रस्त्याच्या बाजूला दगड टाकले जात आहेत. या गावांतील सर्व नागरिकांना बाजारपेठ व प्रत्येक कामासाठी बाहेर गावी जावे लागत आहे. त्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. या भागातील लोकांच्या मते हे काम जाणीव पुर्वक प्रशासनाकडुन केले जात नाही. या कामाच्या संदर्भात सखोल चोकशी व्हावी व यातील असलेल्या अडचणी सोडवून हा रस्ता लवकरात लवकर करून द्यावा अश्या मागणीचे निवेदन देवणीचे तहसीलदार सुरेश घोळवे यांना लिगायत महासंघाच्या वतीने देण्यात आले. यावेळी लिगायत महासंघाचे देवणी तालुका अध्यक्ष माधव बेजरंगे, धानेश्वर सावंत, शंकर पाटील, राहुल श्रीवास्तव, अक्षय सोनकांबळे यांनी तहसीलदार सुरेश घोळवे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. तसेच याच्या प्रती जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठाविले आहेत.

## मराठवाडा विकास मंडळांना मुदतवाढ द्या!

### अहमदपूर येथे धरणे निदर्शने अंदोलन

**अहमदपूर/प्रतिनिधी**

मराठवाडा विकास महामंडळा सह इतर विकास महामंडळाला शासनाने मुदतवाढ देण्यात यावी या मागणीसाठी मराठवाडा जनता विकास परिषद तालूका शाखा अहमदपूर च्या वतीने येथील उपजिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे व निदर्शने अंदोलन करण्यात आले. येथील उपजिल्हाधिकारी यांच्या कडे देण्यात आलेल्या निवेदनात पूढे म्हटले आहे की, मराठवाड्यातील बहुतांश आमदार-खासदार यांनी मुख्यमंत्री आणी राज्यपालांना निवेदन देवून विकास मंडळाला मूदथ वाढ देण्याची मागणी केली आहे. मात्र शासनानाने अद्यापपर्यंत निर्णय घेतला नाही.म्हणून आज दिनांक १५ ऑगस्ट २०२० रोजी मराठवाडा जनता विकास परिषद तर्फे मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालय, उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला होता त्या नूसार आज धरणे व निदर्शने अंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. शासन राजकीय कारणांमुळे तसेच पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांच्या दबावाखाली मराठवाडा व विदर्भाच्या घटनात्मक अधिकारांची पायमल्ली करत आहे या भागाच्या विकासाकडे कानाडोळा करत आहे अशी या भागातील जनता लोकप्रतिनिधींची भावना होत. सध्या या विकास मंडळांना मुदतवाढीच्या मागणी बाबत होत असलेल्या दिरंगाईचा आम्ही निषेध करीत आहोत असेही मराठवाडा जनता विकास परिषदेने आपल्या पत्रकात म्हटले आहे. या मागणीसाठी अहमदपूर तालुका शाखेच्या वतीने शारीरिक अंतर पाळत मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनावर मराठवाडा जनता विकास परिषदेचे सचिव डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी, नगरसेवक सय्यद ताजोद्दीन, सामाजिक कार्यकर्ते शेख अय्याज,पत्रकार बासीदखान पठाण, गफारखान पठाण, अजय भालेराव, मेघराज गायकवाड, गोविंद काळे, शेख जिलानी, सय्यद याखूब, सचिन बानाटे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## भिवंडीत १३ लाखांच्या घरफोडीच्या गुन्ह्याची २४ तासात उकल

**भिवंडी/प्रतिनिधी**

१३ लाखांच्या घरफोडीच्या गुन्ह्याची २४ तासात उकल करण्यात भिवंडीतील नारपोली पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी आरोपीकडून १३ लाख ३२ हजार ६४६ रुपयांचा चोरी केलेला मुद्देमाल हस्तगत करून त्याला बेड्या ठोकल्या आहे. तर त्याच्या चार साथीदारांचा पोलीस शोध घेत आहेत. अजीज मोहम्मद इद्रिस खान (वय ३६ रा. शांतीनगर भिवंडी) असे पोलिसांनी अटक केलेल्या मुख्य आरोपीचे नाव आहे. तर लकी व शमीसह आणखी २ साथीदार असे चार जण फरार आहेत. भिवंडी शहरात लॉकडाऊन काळात गुन्हेगारीचा आलेख कमी होता. मात्र अनलॉक काळात पुन्हा गुन्हेगारीत वाढ झाल्याचे विविध पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या घटनांवरून दिसून येत आहे. त्यातच भिवंडीतील ओसवालवाडी परिसरात चेतन सुरजमल गढवाल हे राहत असून त्यांचे राहनाळ गावातील कांचन कंपांउंडमध्ये राजश्री वेअर हाऊंस नावाने गोडाऊन आहे. या गोडाऊनमध्ये कपडा तयार करण्यासाठी लागणारे धाग्याचे यार्न साठवून ठेवण्यात आले होते. नेहमीप्रमाणे




५ ऑगस्ट रोजी सायकांळच्या सुमाराला गोडाऊन बंद करून चेतन घरी गेले होते. ते पुन्हा दुसऱ्या दिवशी गोडाऊन उघडण्यासाठी आले असता त्यांना आधी पासून गोडाऊनचे शटर उचकटलेले दिसले. त्यामुळे त्यांनी तातडीने नारपोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन गोडाऊनमधून सुमारे १३ लाख ३२ हजार ६४६ रुपयांचे धाग्याचे यार्न चोरीस गेल्याची तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी विविध कलमानुसार अज्ञात चोरट्यां विरोधात जबरी घरफोडीचा गुन्हा दाखल करून पोलीस उपनिरीक्षक आर. जे. व्हरकटे यांच्यासह पोलीस हवालदार सातपुते, पोना. सोनगीरे, पोलीस शिफाई जाधव, बंडगर, शिरसाठ या पोलीस पथकाने तपास सुरु केला. दरम्यान, तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक व्हरकाटे यांना तांत्रिकबाबी आणि खबऱ्यामार्फत माहिती मिळाली कि, घरफोडीच्या गुन्ह्यातील १ संशयित आरोपी भिवंडीतील धामणकर नाका परिसरात येणार आहे. त्या माहितीनुसार पोलीस पथकाने या ठिकाणी सापळा रचुन अजीजला ताब्यात घेऊन त्याच्याकडे अधिक चौकशी केला असता, त्याने चार साथीदारांच्या मदतीने घरफोडी केल्याची कबुली दिली असून त्याच्याकडून चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक व्हरकाटे यांनी दिली आहे. तर या गुन्ह्यातील फरार चोरट्यांचा शोध सुरु असून लवकरच चारही चोरटे गजाआड करण्यात येणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## उपसरपंचपदी सोनाली पवार यांची बिनविरोध निवड



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कवाड ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी श्रमजीवी संघटनेच्या सोनाली प्रमोद पवार यांची बिनविरोध निवड झाली. विद्यमान उपसरपंच निलेश गुरव यांनी राजीनामा दिल्यानंतर ही निवडणूक आज सर्व सदस्यांच्या उपस्थितीत बिनविरोध पार पडली. यावेळी कैलास जाधव यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. सोनाली पवार या कला पदवीधर असून विधी शाखेच्या विद्यार्थीनी असून श्रमजीवी संघटनेचे युवक जिल्हा अध्यक्ष प्रमोद पवार यांच्या त्या पत्नी आहेत. भिवंडी तालुक्यातील कवाड ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीत भाजपा व श्रमजीवी संघटनेने युती करून भाजपा जनता युवा मोर्चा तालुका अध्यक्ष निलेश गुरव व श्रमजीवी युवक जिल्हा प्रमुख प्रमोद पवार यांच्या युवा नेतृत्वाखाली निवडणुकीत अभूतपूर्व विजय संपादन केला होता. या निवडणुकीत माजी उपसरपंच तथा सदस्य निलेश गुरव, सरपंच शुभांगी जगदीश हडके, माजी सरपंच तथा सदस्य कविता मुकेश भांगरे, प्रशांत डोंगरे, तानाजी लहांगे, बेबी देविदास जाधव, गोविंद मुंजे, विजय भांगरे, राजश्री राजेश दुमाडा, सचिन शेलार, इत्यादी सदस्य ग्रामविकास अधिकारी कैलास जाधव, दिलीप जाधव उपस्थित होते, तर नवनिर्वाचित उपसरपंच सोनाली प्रमोद पवार यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यासाठी श्रमजीवी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक सापटे, कल्पेश (बाळू) जाधव, भूषण घोडविंदे, भूषण जाधव, शैलेश पाटील, देविदास जाधव, राजेंद्र काबाडी, नितीन जोशी, ॲड दिनेश जाधव, रामचंद्र डोंगरे, राम पाटील, राजेश दुमाडा उपस्थित होते.

## भातपीक घेणाऱ्या भिवंडीत प्रथमच भुईमुगाची यशस्वी शेती

**भिवंडी/प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यात सर्वात जास्त भातपीक भिवंडी तालुक्यात घेतला जातो. मात्र पावसाचा भरोसा नाही केव्हा कमी केव्हा जास्त त्यामध्ये शेत मजूर मिळत नाही. त्यामुळे मोठी मेहनत घेऊन भातपीक येथील शेतकऱ्यांना घ्यावे लागत आहे. लॉकडाऊनच्या काळात बहुसंख्य शेतकरी कर्जबाजारी सुद्धा झाले आहे, अशा कोरोनाच्या पाश्वभूमीवर सुरु असलेल्या लॉकडाऊनमध्ये पहारे गावातील तरुण शेतकरी दिपक नारायण भोईर याने भोईमूगाच्या शेतीचा पहिला उपक्रम राबवला असून त्यासाठी मातीची तपासणी करून अतिशय चांगल्या प्रकारे भुईमूग लावला असून हे भुईमुंगाचं पीक टवटवीत आले आहे. तर त्याला भरगच्चं अशा शेंगा आल्या



आहे. तब्बल दिड एकरमध्ये भुईमुंगाची शेती लावली असून हा भिवंडी तालुक्यातील पहिलाच प्रयोग असल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी चांगले पीक आल्याचे पाहिल्याने पुढच्या वर्षी भुईमूगाचे पीक घेण्याचा निर्णय सुद्धा घेतला आहे.

पावसाचा भरोसा नाही तर शेतमजूर मिळत नसल्याने भातपीक घेण्यास अनेक अडचणी येत असल्याने कमी मेहनत आणि पीक जास्त मिळणाऱ्या भुईमुगाच्या पिकाकडे शेतकरी वळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याने तरुण शेतकरी दिपक भोईर यांचे पंचक्रोशीत कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

वकील - अँड. अमित देशमुख

**जाहीर नोटीस**

वसई येथील मे. प्रथम न्यायदंडाधिकारी ह्यांचे न्यायालयात

चौ. अर्ज क्र. ५२९/२०२०

कु. ब्रिनेल ब्रायन ग्रेशियस ..... अर्जदार

विरूद्ध

मा. निबंधक जन्म मृत्यू नोंदणी

वसई-विरार शहर महानगरपालिका ..... सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदार ह्यांची आई कै. ग्योमार ब्रायन ग्रेशियस मृत्यू दि. २१/०१/२००६ साली झाला आहे आणि ज्याअर्थी वरील नोंद करण्याबाबत आदेश मिळणेकरिता या न्यायालयात चौ. अर्ज क्र. ५२९/२०२० दाखल केलेला आहे. त्याकामी ज्याकोणी इसमांची हरकत असेल त्यांनी या न्यायालयात ही नोटीस प्रसिदध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी हरकत करावी. सदरहून आदेश देण्याबाबत जर कोणत्याही इसमांची हरकत दाखल न झाल्यास योग्य ते पुरावे कागदपत्रे घेऊन अर्जदाराला मृत्यूची नोंद करण्याबाबत आदेश देण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी. आज दि. २७/०७/२०२० रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिली.

सही
लिपिक

**सहायक**
दिवाणी न्यायालय क स्तर

वकील - अँड. अमित देशमुख

**जाहीर नोटीस**

वसई येथील मे. प्रथम न्यायदंडाधिकारी ह्यांचे न्यायालयात

चौ. अर्ज क्र. ५२७/२०२०

श्री. चेतन प्रभाकर म्हात्रे ..... अर्जदार

विरूद्ध

मा. निबंधक जन्म मृत्यू नोंदणी

वसई-विरार शहर महानगरपालिका ..... सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदार ह्यांची आई कै. कुसुम प्रभाकर म्हात्रे मृत्यू दि. ११/०८/२०१४ साली झाला आहे आणि ज्याअर्थी वरील नोंद करण्याबाबत आदेश मिळणेकरिता या न्यायालयात चौ. अर्ज क्र. ५२७/२०२० दाखल केलेला आहे. त्याकामी ज्याकोणी इसमांची हरकत असेल त्यांनी या न्यायालयात ही नोटीस प्रसिदध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी हरकत करावी. सदरहून आदेश देण्याबाबत जर कोणत्याही इसमांची हरकत दाखल न झाल्यास योग्य ते पुरावे कागदपत्रे घेऊन अर्जदाराला मृत्यूची नोंद करण्याबाबत आदेश देण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी. आज दि. २७/०७/२०२० रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिली.

सही
लिपिक

**सहायक**
दिवाणी न्यायालय क स्तर

# पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण!

**लातूर/प्रतिनिधी**



भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७३ व्या वर्धापन दिना निमित्त वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ९.०५ वाजता मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी जिल्हाधिकारी जी.श्रीकांत, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, पोलीस अधिक्षक राजेंद्र माने, महापौर विक्रांत गोजमगुंडे, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे,अतिरिक्त पोलीस अधिक्षक हिंमत जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी जीवन देसाई, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन सांगळे व इतर निमंत्रित मान्यवर उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री अमित देशमुख यांनी स्वातंत्र्य दिन समारंभाला उपस्थित निमंत्रीत लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व अन्य मान्यवरांची भेट घेऊन त्यांना व सर्व जिल्हावासियांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच कृषि विभाग व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने रान-भाजी महोत्सव दिनांक १६ ऑगस्ट २०२० रोजी औसा रोडवरील दत्त मंदिर प्रांगणात आयोजित करण्यात आला असून त्यानिमित्त प्रातिनिधीक स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात थाटण्यात आलेल्या रान- भाजी स्टॉलचे उद्घाटन पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी स्टॉल मध्ये ठेवण्यात आलेल्या रान- भाज्यांची माहिती देऊन त्यांचे आरोग्यासाठी असलेले महत्व विशद केले.

स्वातंत्र्य दिन समारंभाचे ड्रोनव्दारे फेसबुक लाईव्ह : भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७३ व्या वर्धापन दिनाचे जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांच्या https://www.facebook.com/G.SreekanthI-S/ यांच्या फेसबुक पेजवरुन लाईव्ह दाखविण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रथमच थेट ऑनलाईन प्रक्षेपण ड्रोनव्दारे करण्यात आले. त्यामुळे हजारो लातूरकर नागरिकांना हा कार्यक्रम कोरोनाच्या पार्श्वभूमीवर घरी बसून पाहता आला. या कार्यक्रमास उपस्थित राहू न शकलेले स्वातंत्र्य सैनिक, वीर-माता, वीर पत्नी, वीर पिता या सर्वांचा प्रशासनाच्या वतीने त्यांच्या घरी जाऊन शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पालकमंत्री महोदयांचा स्वातंत्र्य दिनाचा सैनिकांसाठीचा शुभेच्छा संदेश ही देण्यात आला.

# पालघर जिल्हा राज्यात प्रगतिशिल जिल्हा म्हणून ओळख निर्माण करेल -पालकमंत्री दादाजी भुसे





**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्हा सागरी, नागरी व डोंगरी अशा वैविध्यपूर्ण भौगोलिक रचनेचा जिल्हा असल्यामुळे येणाऱ्या अडचणींवर नियोजनबद्ध पद्धतीने मात करुन प्रशासनाने विविध विकास कामांमध्ये आघाडी घेतली आहे. सामान्य माणूस हा केंद्रबिंदू मानून विकासाचे नियोजन करण्यात आले आहे. शाश्वत व नियोजनबद्ध पद्धतीने विकास सुरु आहे. आज पालघर जिल्ह्यात जी विकासकामे सुरू आहेत, ती पाहता लवकरच आपला जिल्हा राज्यात प्रगतीशील जिल्हा म्हणून ओळख निर्माण करेल यात शंका नाही. शासन आणि जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न तसेच जनसहभाग यामुळेच हे साध्य होणार आहे. असे प्रतिपादन आज पालकमंत्री कृषीमंत्री तथा पालघर जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले.

१५ ऑगस्ट राष्ट्रीय स्वातंत्र्यदिनानिमीत्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पालघर जिल्ह्याला असलेल्या स्वातंत्र्य चळवळीच्या गौरवशाली परंपरेची आठवण करून स्वातंत्र्य लढ्यात शहिद झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांचे स्मरण करून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी वसई विरार महानगर पालिका क्षेत्रातील तसेच पालघर ग्रामीण भागातील कोविड संदर्भात असलेल्या सोईसुविधांचा उल्लेख करून आरोग्यविभागासोबतच काम करत असलेले महसूल विभाग, पोलीस दल, जिल्हा परिषद, नगरपरिषद तसेच इतर विभागातील अधिकारी व कर्मचारी आणि जिल्ह्यातील खाजगी डॉक्टर यांचे महत्त्वाचे योगदान असून आपले कर्तव्य बजावत असताना कोरोनामध्ये जे कर्मचारी शहिद झाले आहेत. त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करून त्यांना शासनातर्फे सहाय्य दिले जाईल अशी ग्वाही यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

खरीप हंगामात कृषी विभागाने ६७ हजार आदिवासी शेतकऱ्यांसाठी प्रती शेतकरी २५० ग्राम तुरीचे बियाणे मोफत वाटप करून त्याची पेरणी भाताच्या शेताच्या बांधावर करून घेतली आहे. यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना येणाऱ्या कालावधीत चांगल्या प्रतीची तूर उपलब्ध होईल. यामुळे त्यांच्या आहारात प्रथिनांच्या प्रमाणात वाढ होऊन कुपोषण कमी होण्यास मदत होईल तसेच जिल्ह्यातील कुपोषण व बाल मृत्यु कमी करण्यासाठी स्थापन केलेल्या विशेष टास्क फोर्सच्या माध्यमातून केलेल्या कामामुळे आज कुपोषण व बालमृत्य कमी करण्यात ...पान ६ वर



विरार शहरात मनवेलपाडा भागात असलेल्या नवनिशीगंधा सोसायटीमध्ये ७४वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सोसायटीतील सर्व सभासदांनी सोशल डिन्टन्सिंग पाळून झेंड्याला सलामी देऊन राष्ट्रगीत गायन करून झेंडावंदन करण्यात आले. यावेळी इमारतीतील रहिवाशांना मिठाईचे वाटप करण्यात आले. (छाया : प्रथमेश पाटोळे)

अरेरे... आज बाळासाहेब असायला हवे होते!

# हार्टच्या पेशंटला मदत करण्यास शिवसेना खासदारांचा नकार!

**विरार/प्रतिनिधी**

संकट काळात एखाद्या माणसाला मदत करणे हा मनुष्य धर्म आहे. पण आज कोरोनाच्या या संकट काळात इतरांना मदत करायची सोडाच पण गंभीर आजारी रुग्णांना सुद्धा मदत करायला काही लोकप्रतिनिधी तयार नाहीत. विरारमध्ये राहणारे सोनू जाधव हे हार्टचे पेशंट आहेत. मात्र गंभीर आजारी रुग्णांनाही लोकल प्रवासाची सवलत नसल्याने त्यांना गेल्या चार महिन्यांपासून केईएममध्ये उपचारासाठी जाता आले नाही. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावली होती म्हणून त्यांनी मदतीसाठी शिवसेना खासदार व माजी केंद्रीय मंत्री अरविंद सावंत यांना मदतीसाठी फोन करून आपल्यासारख्याच गंभीर आजारी रुग्णाची सध्या काय परिस्थिती आहे ते सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी मदतीचा हात देण्याचे सोडाच वरून सोनू जाधव यांनाच चार गोष्टी सूनवल्या आणि मदत करण्यास नकार दिला. त्यामुळे बाळासाहेबांच्या वेळची शिवसेना आता राहिलेली नाही अशी संतप्त प्रतिक्रिया सोनू जाधव यांनी व्यक्त केली आहे.

विरार पूर्वेकडील सुशीला प्राइड या इमारतीत राहणारे सोनू जाधव यांना दोन वेळा हार्टअ‍ॅटॅक येऊन गेला आणि त्यांची तीनदा इंजोग्रफी तर दोनदा इंजोप्लाटी झालीय. त्यांच्यावर केईएम ...पान ६ वर



खा.अरविंद सावंत

# पत्रकारांना संरक्षण,शहरात पत्रकार भवन आणि पत्रकारांसाठी घरकुल देण्याची मागणी

**अहमदपूर/प्रतिनीधी**



लातुर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औराद शहाजानी या ठिकाणी लाँकडाऊन काळात व्रत्त संकलन करनाऱ्या पत्रकारांना मारहाण करणाऱ्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यावर कार्यवाही करावी तसेच अहमदपूर तालुक्यातील पत्रकारांना राहण्यासाठी स्वतःचे घरकुल व पत्रकारांसाठी पत्रकार भवन बांधुन देण्यात यावे या मागणीचे उपजिल्हाधिकारी यांना मराठी समविचारी पत्रकार संघाच्या वतिने तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांच्या वतिने निवेदन देण्यात आले निवेदन नायब तहसिलदार बबीता आळंदे यांच्या कडे देण्यात आले.

पत्रकारीता करणाऱ्यांना कसलीच पगार व मानधन नसताना केवळ सत्याचा शोध घेत जनसामान्याला न्याय मिळवुन देणे या एकमेव माणसिकतेच्या माध्यमातुन पत्रकार आपल्या लेखनितुन बातम्यांच्या माध्यमातुन जनसामान्यांपर्यत सत्यता पहोचविण्याचे काम करत असतात पत्रकारिता करत असताना चोवीस तास बातम्या संकलनाच्या कामात व्यस्त असनार्या पत्रकारांना कसल्याच प्रकारचे मानधन वा पगारी नसल्यामुळे स्वतःहच्या परिवाराचे उदरनिर्वाहासाठी अनेक अडचणिंचा सामना पत्रकारांना करावा लागतो पत्रकारांना आपल्या हक्काचे घर मिळावे म्हणुन केंद्र व राज्यसरकारने पत्रकारांसाठी शहरा जवळील शासकीय जागा उपलब्द्ध करुन देऊन पत्रकारांसाठी हक्काचे घरकुल बांधून द्यावीत व अहमदपूर नगरपालिकेच्या शहरातील मालकी जागेत पत्रकारांसाठी पत्रकार भवन बांधुन द्यावे असे निवेदन उपजिल्हाधिकारी यांना सर्वपत्रकार बांधवांच्या वतिने देण्यात आले यावेळी मराठी समविचारी पत्रकार संघाचे मार्गदर्शन उदयकुमार जोशी, संस्थापक अध्यक्ष सलिम सय्यद, सचिव प्रा.रत्नकार नळेगावकर, विद्यमान तालुका अध्यक्ष बासिदखान पठाण सचिव नरसिंह सांगविकर, उपाध्यक्ष प्रा.सचिन कोंडलवाडे, सहसचिव प्रा सादिक शेख, प्रा.बाबन अत्तार, मेघराज गायकवाड, रामलिंग तत्तापुरे, गोविंद गिरी, गोविंद काळे, गणेश हामणे, फिरोज शेख, संजय माकेगावकर, विनोद वट्टमवार, हनुमंत जोगदंड, उदय गुंडीले, नासेर सय्यद,देवनाळे सर, प्रा.मारोती बुद्रुक पाटील, गणेश मदणे, असलम शेख, राजमोहम्मद शेख, साबेर शेख आदी पत्रकारांची सहमती व निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत. लाँकडाऊन काळातील महत्वपुर्ण बातम्या संकलन करून लोकांपर्यत पहोचविण्याची जबाबदारी ...पान ६ वर

# विलासराव देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमित्त १० युवकांनी केले स्वंय स्फूर्तीने प्लाझ्माचे दान




**लातूर/प्रतिनिधी**

स्व. विलासरावजी देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमित्त विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था लातूर येथे कोवीड १९ प्लाझ्मा दान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हयातील अहमदपूर येथील- ६, सारोळा -२, उदगीर- १, व लातूर येथील -१ अशा एकूण १० युवकांनी स्वंय स्फूर्तीने प्लाझ्मा दान करून कोवीड १९ अतिगंभीर रुग्णांना आशेचा किरण मिळवून दिला. प्लाझ्मा दात्यांना कसलाही धोका होत नाही ज्या पद्धतीने आपण रक्तदान करतो त्याही पेक्षा सोपी पद्धत प्लाझ्मा दानाची आहे. त्यामुळे आतापर्यंत प्लाझमा दान केलेल्या कोविड योद्धय़ांना कसलाही त्रास झाला नाही. आज तागायत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था लातूर येथे १३ दात्यांनी स्वयंस्फूर्तीने प्लाझ्मा दान केले असून प्लाझ्मा दाते स्वच्छेने पुढे येऊन सामाजिक बांधिलकी ओळखून मोठ्या प्रमाणात प्लाझ्मा दान करण्यास दात्यांचे सहकार्य मिळत आहे. मी आता कोरोना आजारातून बरा झालो आहे आणि पुन्हा काही तरी होईल अशा भीतीपोटी न राहता कोविड १९ आजारातून बरे झालेल्या दात्यांनी स्वतःहून प्लाझ्मा दान करण्यासाठी पुढे यावे त्यामुळे अति गंभीर व मध्यम प्रकारची लक्षणे असणाऱ्या कोरोना बाधित रुग्णांना जीवदान मिळण्यास मदत होईल असे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. मोहन डोईबळे यांनी केले. या वेळी उपअधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर उपअधिष्ठाता डॉ. उदय मोहिते...पान ६ वर